# संगीत प्रीतिसंभव



दोन अंकी मराठी संगीत नाटक

-:लेखक:-

श्रीनिवास शारंगपाणी

# संगीत प्रीतिसंभव

## दोन अंकी मराठी संगीत नाटक

-:लेखक:-

## श्रीनिवास शारंगपाणी

## ई साहित्य प्रतिष्ठान

# संगीत प्रीतिसंभव


## लेखक:- **श्रीनिवास शारंगपाणी.**

७१४/१, नारायण पेठ, लक्ष्मी रोड,
बँक ऑफ इंडियासमोर,
पुणे-४११०३०
भ्रमणध्वनी: ९२२५६३६३५३
ईमेल: shrisharang@hotmail.com, shrisharang@gmail.com



मुखपृष्ठ – श्रीनिवास शारंगपाणी



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव WhatsApp वर कळवा)

प्रकाशन :- २० मार्च २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्रीनिवास शारंगपाणी—साहित्यिक परिचय



| | |
|---|---|
| जन्म | ३० ऑक्टोबर १९४९ रत्नागिरी येथे |
| शिक्षण | इंजिनियरिंग पदवी |
| नोकरी | १९७३-२००९ वाहननिर्माण कंपन्यांमध्ये उत्पादन विकास क्षेत्रात. त्यानंतर तांत्रिक सल्लागार |
| लेखनप्रारंभ | १९६६ मध्ये महाविद्यालयीन शिक्षणादरम्यान सुरुवात कविता आणि लेखांपासून. |
| प्रारंभीचे लेखन | स्वराज्य साप्ताहिकामध्ये कविता, वाङ्मयशोभा मासिकात लेख तसेच नवल मासिकामधून शास्त्रीय नवलकथा आणि गूढकथा. |

| | |
|---|---|
| नियमित लेखन | • मराठी/इंग्रजीतून विज्ञान/ विनोदी/ गूढकथा, कविता, गीते, कादंबऱ्या, नाटके इ. चे लेखन.<br>• रविवार दै. प्रभातच्या "रूपगंध" पुरवणीत मार्च २०१९पासून नियमित स्तंभलेखन |

**प्रसिद्ध साहित्य** • सकाळ, साप्ताहिक सकाळ, केसरी, अमृत, मोहिनी आणि नवल यांसारख्या दर्जेदार अंकांतून लेख, कविता, कथा.

• मराठी कादंबरी—राजकीय रोमांचिका "षडयंत्र" १९९२मध्ये प्रसिद्ध. २०१९मध्ये पुनर्प्रकाशित

• चित्रपटसृष्टीवरील मराठी कादंबरी--"इये स्वप्नांचिये नगरी" २००९मध्ये प्रसिद्ध. २०१८मध्ये पुनर्प्रकाशित

• "Manipulations" ही "षडयंत्र"ची स्वत:च अनुवाद केलेली इंग्रजी कादंबरी अमेरिका / कॅनडा येथे २००२ मध्ये प्रसिद्ध

• "Brahma's Breath" ही इंग्रजी विश्व-उत्पत्तीविषयीची विज्ञानकाल्पनिका आंतरराष्ट्रीय प्रकाशनसंस्था Smashwords यांनी २०११ मध्ये प्रसिद्ध केली

• "Our Distant Cousins" ही मंगळमोहिमेवरची भविष्यवेधी विज्ञान काल्पनिका जर्मन प्रकाशनसंस्थेने २०१३ मध्ये प्रकाशित केली.

• "Death of A Mad Mathematician" हे इंग्रजी नाटक विख्यात गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन व अकाली मृत्यूवर लिहिले असून त्याचे स्वतंत्र थिएटर्स यांनी हिंदीमध्ये रूपांतरण करून ते २०१७मध्ये रंगमंचावर आणले. आश्लेषा महाजन यांनी केलेले मराठी रूपांतर आकाशवाणीवर ८ भागात प्रसारित.

- “प्रीतिसंभव” हे मराठी संगीत नाटक लिहिले असून त्यातील २७ नाट्यपदे लिहिली आहेत.

- काही मराठी नाटके व एक एकांकिका यांचे लेखन.

- शून्याचा शोध लावणाऱ्या ब्रह्मगुप्ताच्या जीवनावर इंग्रजी नाटक “Value of Nothing” रंगमंचावरील सादरीकरणासाठी तयार.

- “विज्ञान-गूढकथा” हा विज्ञान आणि गूढकथांचा संग्रह २०११मध्ये प्रकाशित.

- “पॉलिकिलर्स व इतर विज्ञानकथा” हा विज्ञानकथा २०१९ मध्ये विश्वकर्मातर्फे प्रकाशित.

- मराठी कथासंग्रह ’कथा कॅथार्सिस’ नुकताच प्रसिद्ध झाला

- इंग्रजी कादंबरी ‘Shining Darkness’ लवकरच प्रकाशित होत आहे.

- शालेय कुमारांसाठी आश्लेषा महाजन यांनी लिहिलेल्या ७० मराठी कवितांचे

इंग्रजी गेय कवितांमध्ये मी रूपांतर केले असून ते “School दुनिया” या रूपात २०१३मध्ये प्रसिद्ध.

- मी लिहिलेल्या ९ गीतांचा “ओठात धुंद मदिरा” हा आल्बम उपलब्ध आहे. याचा गीतकार मी असून संगीतकार शरद करमरकर आहेत आणि गीते रवींद्र साठे, सुवर्णा माटेगावकर आणि स्वत: शरद करमरकर यांनी गायलेली आहेत. त्यातील ५ गीते आकाशवाणीने स्वीकारली असून ती वरचेवर प्रक्षेपित केली जातील.

- पटकथा लिहिण्याचा अनुभव

**विशेष गौरव** • षडयंत्र या कादंबरीचा साप्ताहिक सकाळच्या १९९२मध्ये प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट पुस्तकांच्या यादीत समावेश

- याच कादंबरीचा सातारा साहित्य-संमेलनात उत्कृष्ट पुस्तक असा नामोल्लेख

- "Brahma's Breath" साठी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. गोविंद स्वरूप यांची प्रशस्ती.

- "Our Distant Cousins" या कादंबरीचे "अतिदूरचे बांधव" हे आश्लेषा महाजन यांनी केलेले मराठी रूपांतर ISROचे माजी संचालक सुरेश नाईक आणि विख्यात खगोलज्ञ अरविंद परांजप्ये यांनी गौरविलेले आहे.

- "विळखा" या कथेला पुणे पोस्ट पाक्षिकाने आयोजिलेल्या कथा स्पर्धेमध्ये पारितोषिक.

- Death of A Mad Mathematician या नाटकाच्या हिंदी रूपांतराच्या सादरीकरणाचा वृत्तपत्रांनी गौरव केला आहे.

इतर उपक्रम

सामान्यांसाठी उपयुक्त संशोधन आणि नवनिर्मिती, शास्त्रीय विषयांवर देश-विदेशातून व्याख्याने व सादरीकरणे. आकाशवाणीवर व इतरत्र अनेक भाषणे व कथाकथन. ४०हून अधिक देशांमध्ये प्रवास आणि अनेक देशात तज्ञ सल्लागार या नात्याने काम. शास्त्रीय संशोधनाबद्दल एक पेटंट प्राप्त व काही विचाराधीन.

# अर्पणपत्रिका

संगीत नाटकांसाठी आपलं तन, मन आणि धन अर्पिलेल्या सर्वांना मी हे माझं पहिलंवहिलं संगीत नाटक अर्पण करीत आहे.

# मनोगत

गेली कित्येक वर्षं मी ऐकत होतो की “संगीत नाटकांना वाईट दिवस आले आहेत”, “दर्जेदार नाट्यपदांसह नव्या चांगल्या संहिता पुढे येतच नाहीत” इ. इ. कुठलंही आव्हान स्वीकारण्याची माझी भूमिका (हट्टीपणा म्हणा हवं तर) असल्यामुळे मी हेही आव्हान स्वीकारलं आणि बराच काळ मनामध्ये प्रेम-त्रिकोण असलेलं कथानक संगीत नाटकात बांधायचं ठरवलं. संगीत नाटकासाठी राजे-रजवाड्यांची पार्श्वभूमी घेतली आणि नाटक लिहिलं. प्रत्येक प्रवेशाला अनुसरून नाट्यपदंही लिहिली. मात्र संहिता निर्माते, दिग्दर्शक तसंच भावी प्रेक्षकांना रुचणारी आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी मी अनेकांना (विशेषतः चांगल्या संहिता उपलब्ध नाहीत असं म्हणणाऱ्या) संहिता दाखवण्याची तयारी दर्शवली. पण कुणीही संहिता हातात घ्यायला तयार झालं नाही. नाटक मंचावर आणण्यासाठी मदत करण्याचीही सर्वांनी असमर्थता व्यक्त केली. मात्र रत्नागिरी येथील खल्वायन या एकमेव संस्थेनं संहिता वाचून त्यामध्ये काही बदल सुचवले. नाटक रंगमंचावर आणण्याची तयारीही दाखवली. या सर्व अभ्यासातून हे निष्पन्न झालं की संगीत नाटकाच्या मंचीय आविष्कारासाठी खूप खर्च येतो. आता त्या दिशेनं कुणी प्रायोजक मिळतो का त्याची चाचपणी सुरू आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या नाटकाला रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचं प्रमाणपत्र (सेन्सॉर सर्टिफिकेट) प्राप्त झालं आहे.

ई-साहित्य ही मान्यवर संस्था हे माझं संगीत नाटक प्रकाशित करीत आहेत त्याबद्दल त्यांचे तसंच संस्थेचे सुनीळ सामंत यांचे आभार. खल्वायन नाट्यसंस्थेचे श्री. मनोहर जोशी आणि श्री श्रीनिवास जोशी यांचाही मी ऋणी आहे.

या नाटकाचं रंगमंचीय वाचिक अथवा कोणत्याही प्रकारचं सादरीकरण करण्याअगोदर लेखकाची लेखी परवानगी घेणं आवश्यक आहे.

**—श्रीनिवास शारंगपाणी, *पुणे***

**मार्च २०२४**

# रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे कायमस्वरूपी योग्यता प्रमाणपत्र

| | |
|---|---|
| प्रमाणपत्राचा क्रमांक : . . . . . . | डीआरएम- ४३६ /२०२३ |
| तारीख : . . . . . . | २६.०५.२०२३. |
| अर्जदाराचे नाव : . . . . . . | श्रीनिवास मधुसुदन शारंगपाणी |
| ज्या व्यक्तीच्या/मंडळाच्या वतीने अर्ज केला त्या व्यक्तीचे/मंडळाचे नाव : . . . . | स्वत |
| अर्जदाराचा पत्ता : . . . . . . | ७१४/१, नारायण पेठ, लक्ष्मी रोड, बँक ऑफ इंडियासमोर, पुणे - ४११ ०३० |
| अर्जाची तारीख : . . . . . . | १९ / ०९ / २०२२ |
| लिखाणाचे शीर्षक व लेखकाचे नाव : . . . . | |
| प्रकाशकाचे नाव : . . . . . . | श्रीनिवास शारंगपाणी लिखित मराठी व्यावसायिक नाटक :-" संगीत प्रीतिसंभव " |
| प्रकाशन वर्ष व आवृत्ती : . . . . | |

**दाखला देण्यात येतो की, उपरिनिर्दिष्ट करमणुकीच्या कार्यक्रमाचे लिखाण हे महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक करमणुकीचा कार्यक्रम म्हणून करण्यास किंवा दाखविण्यास योग्य आहे. नमूद केलेल्या अटी बंधनकारक आहेत.**

**अटी :**

**कोणताही भाग न वगळता मंजुर.**

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ ★ महाराष्ट्र शासन ★

( विजय विद्याधर गोखले )

**अध्यक्ष**

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ

महाराष्ट्र शासन, मुंबई

**राज्य शासनाने केलेला नियम :—**

[सार्वजनिक करमणुकीच्या जागांवर नियंत्रण ठेवण्याविषयीचा नियम १३८(१) पहा]

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या अध्यक्षांस, सदस्यांस आणि सचिवांस कोणताही करमणुकीचा कार्यक्रम ज्या जागी केला अथवा दाखविला जावयाचा असेल अथवा करण्यात अथवा दाखविण्यात येत असेल, अशा कोणत्याही जागी विनामूल्य प्रवेश करू दिला पाहिजे व त्यांचेसाठी सदर कार्यक्रम आयोजित करणाऱ्याने सर्वोच्च वर्गात दोन जागा राखून ठेवल्या पाहिजेत.

# संगीत नाटक-प्रीतिसंभव

## पात्र परिचय

१. राजा कृतवर्मा—न्यायनिष्ठ आणि चांगला राजा. त्यानं राज्याचा खूप मोठा विस्तार केलेला आहे. हे पात्र रंगभूमीवर येत नाही.

२. समरकेतू—कृतवर्मा राजाचा पुतण्या. कृतवर्माचा मोठा भाऊ समरजीत लढाईत मारला गेला. त्याचा अगदी लहान मुलगा गादीवर बसू शकत नसल्यानं कृतवर्मा राष्ट्रप्रमुख झाला.

३. रणधीर—कृतवर्माचा मुलगा. समरकेतूपेक्षा ३ वर्षांनी लहान. समरकेतू आणि रणधीर दोघेही मोठे झाल्यावर मोठ्या राज्याचे दोन भाग करून दोघांना राज्याभिषेक करायचा आणि संघर्ष टाळायचा कृतवर्माचा निश्चय.

४. ललिता—शेजारील राज्याचा राजा भृंगराज याची एकुलती एक कन्या. भृंगराजाला ललिताशिवाय कोणीही नसल्यानं तो मृत्यूपूर्वी कृतवर्माच्या ताब्यात राज्य देऊन त्याच्याकडून वचन घेतो की तो तिचा सांभाळ करील आणि सुखात ठेवेल. कृतवर्मा तिला आपल्या राजवाड्याजवळच एक प्रासाद बांधून तिचा सांभाळ करतो. ललितावर समरकेतू आणि रणधीर या दोघांचंही प्रेम आहे. ललितालाही दोघं आवडतात. ललिता एक चांगली चित्रकारही आहे.

५. प्रमोदिनी—ललिताची सखी-सेविका

६. जैन गुरु

७. आरव (सेवक)

८. विदूषक

९. हेमवती—एक दासी, प्रमोदिनीची सखी. हेही पात्र रंगमंचावर येत नाही.

१०.सैनिक

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

(स्थळ: राजवाड्याबाहेरील उद्यान. ललिता प्रमोदिनीशी गप्पा मारत बसली आहे.)

प्रमोदिनी: आज राजकुमारी खूप आनंदात दिसतायत...

ललिता: असंच काही नाही. मी नेहमीच आनंदात असते. सगळी सुखं हात जोडून आहेत माझ्यापुढं. महाराजांची कृपादृष्टी सदैव आपल्यावर असल्यानंतर कशाचं दु:ख करायचं?

प्रमोदिनी: ते खरंच. पण आता लवकरच राजकुमारींना आपल्या जोडीदाराबद्दलचा विचार करायला हवा.

ललिता: इतक्या लवकर कशाला बंधनात पडायचं?

प्रमोदिनी: पण युवराज्ञीकडे दृष्टी लावून बरेच राजपुत्र असणारेत म्हटलं. अगबाई, रणधीरराजे इकडेच येतायत वाटतं. (लगबगीनं निघून जाते. रणधीर प्रवेश करतो.)

रणधीर: अरे वा, ललिता—खूपच सुंदर दिसत्येयस. तुझ्याकडे असं बघत राहावसंच वाटतं.

ललिता: (लाजून) असं माझ्याकडेच बघत राहिलात तर मग राज्याकडे कोण बघणार?

a

रणधीर: राज्याकडे बघायला आहेत खूप लोक. आणि मी राज्यकारभार बघायला अजून वेळ आहे. महाराजांनी तशी आज्ञा केल्याशिवाय कशाला उगीच लुडबूड करायची? पण हे बघ मी तुझ्याकरता काय आणलंय्. (रणधीर गुलाबाचा गुच्छ समोर धरतो.)

ललिता: अय्या, किती सुंदर.

रणधीर: पण तुझ्याइतका नाही.

## पद १

*सुंदरी, भेटीचा कर स्वीकार!*
*ही भेट नसे तर प्रतीक आहे*
*माझ्या सुमधुर प्रीतीचे*
*सांग माझिया हृदयावरती*
*फक्त तुझा अधिकार...*
*ललिते, भेटीचा कर स्वीकार...*

*तुझीच मूर्ती रात्री-दिवशी*
*दिसे मला मज डोळ्यांपुढती*
*माझ्या आयुष्याला केवळ*
*देशिल तू आकार...*
*ललिते, भेटीचा कर स्वीकार...*

ललिता: इश्श. (हळूच गुच्छ हातात घेते आणि हृदयाशी धरते)

रणधीर: वा: वा: किती छान दिसतेस तू लाजल्यावर...

a

(आरव प्रवेशतो)

आरव: युवराज, थोरल्या महाराजांनी बोलावलंय्.

रणधीर: (कपाळावर आठ्या) आता मला निघायलाच हवं. पुन्हा भेटू. (स्वत:शीच) महाराजांचं पण विचित्रच आहे. सख्ख्या मुलाला सोडून त्या-त्या आपल्या पुतण्यावरच जास्त प्रेम. सारखी त्यालाच मोठी जबाबदारी आणि मला आपलं काहीतरी किरकोळ काम. पण आता काही मोठी जबाबदारी तर देणार आहेत की काय? बघायलाच हवं. (जातो.)

(समरकेतू प्रवेशतो)

समरकेतू: (एकीकडे) रणधीर इथून निघाला आणि ललितेच्या हातात गुलाबपुष्पांचा गुच्छ. याचा अर्थ महाशयांनी हा गुच्छ तिला दिलेला दिसतोय्. म्हणजे त्रांगडंच आहे म्हणायचं की. बाकी फुललेल्या गुलाबाभोवती भुंगे गुंजारव करणारच!

(ललिता लाजून गुच्छ बाजूला करते.)

ललिता: या, या समरकेतू युवराज.

समरकेतू: (गुच्छाकडे कटाक्ष टाकत) ओ हो... मी-मी मात्र काही फुलं वगैरे आणली नाहीत तुला द्यायला. खरं तर तुला माझं सर्वस्वच अर्पण आहे.

ललिता: अगबाई, इतकं काही नको हं.

समरकेतू: सर्वस्वाइतकं काही नको असेल तर या क्षणी ह्याचा स्वीकार कर. (पटकन् गळ्यातली मोत्यांची माळ काढून ललिताच्या हातात ठेवतो. ललिता पुन्हा लाजते पण हळुवारपणे माळ कुरवाळते.)

समरकेतू: ती मौक्तिकमाला गळ्यात घालायला दिल्येय् म्हटलं. चला मीच घालतो कशी. (ललितेच्या गळ्यात माळ घालतो.)

**पद २**

*जशी नक्षत्रांची लड उलगडे रात्रसमयी*
*तसा मोत्यांचा हा सर दिसतसे की तनुवरी*
*तुला ही माला आवडलि तर ते सांग मजला*
*तयाने प्रेमाची पोचहि मिळते तूर्त मजला*

(ललिता मोहक हसते. तिला ती आवडल्याचं स्पष्ट दिसतं. तितक्यात प्रमोदिनी पुन्हा येते.  समरकेतू आणि ललिताच्या कपाळावर आठ्या.)

प्रमोदिनी: (दुसरीकडेच पाहत) महाराजांनी युवराजांना बोलावलंय्.

समरकेतू: आत्ता? (स्वत:शीच) आत्ताच रणधीर येऊन गेलाय्. मला माझं प्रेम व्यक्त करायला निदान तेवढा तरी वेळ मिळायला हवा. पण महाराजांचं काम महत्त्वाचं दिसतंय्. (उघड) पण महाराजांची आज्ञा शिरसावंद्य. जायलाच हवं.

प्रमोदिनी: होय, युवराज. महाराजांची तब्येत जरा बिघडल्येय् सकाळपासून. राजवैद्यांनी आराम करायला सांगितलाय्. तरी पण त्यांना दोन्ही

युवराजांशी बोलायचं होतं. रणधीर युवराजांशी त्यांचं बोलणं चाललंय् पण आपल्यालाही लगेचच बोलावलंय्.

(समरकेतू जातो.)

ललिता: चल प्रमोदिनी. आपणही थोड्या वेळानं तिथं जाऊ या. मला काळजी वाटत्येय्. आपल्यालाही महाराजांच्या तब्येतीकडे पाहिलं पाहिजे.

प्रमोदिनी: होय. जाऊ या. कालपर्यंत तर थोरल्या महाराजांची प्रकृती बरी होती.

(विदूषक प्रवेशतो. कपाळावरील घाम निथळून तो नंतर खाली वाकून / बसून जमिनीवरील काहीतरी शोधू लागतो. तेवढ्यात आरव प्रवेशतो.)

आरव: अरे विदूषका, तू हे काय करतोयस?

विदूषक: मोती शोधतोय्.

आरव: मोती सांडलेत का?

विदूषक: हो… (पुन्हा शोधू लागतो. आरवही इकडे तिकडे पाहू लागतो.)

आरव: मला तर काही दिसत नाहीत? आणि तुझं मोत्यांशी काय काम?

विदूषक: रे आरवा, मी आताच प्रथम युवराज रणधीर राजकुमारी ललितेला फुलं भेट म्हणून देताना आणि नंतर युवराज समरकेतू चक्क मोत्यांची माळ  तिच्या गळयात घालताना पाहिलं.

आरव: मग?

a

विदूषक: फुलं कोमेजून जातात पण मोत्यांची माळ कशी कायमची… होय की नाही?

आरव: मग?

विदूषक: अरे मूढा, मग, मग काय करतोयस?

आरव: मग मी काय बोलू?

विदूषक: पुन्हा मग?

आरव: अरे, हा खटाटोप कशाकरता करतोयस असं म्हणायचंय् मला.

विदूषक: हां, हां. असं होय. हे बघ, मला पण कुणावरचं प्रेम व्यक्त करायचं असेल तर मोतीच दिलेले चांगले नाही का?

आरव: हो, पण मोती कुठायत? इथे हरवलेत का?

विदूषक: नाही रे बाबा, कुणीतरी म्हटलंय् ना की घाम जमिनीवर गाळला की त्याचे मोती होतात…

आरव: मग?

विदूषक: पुन्हा मग?

आरव: अरे, म्हणजे ते कळलं पण पुढे काय?

विदूषक: मी इथे जमिनीवर आत्ता घाम गाळला—आता त्याचे मोती झालेत का ते पाहतोय्. ते मिळाले की मी एखाद्या सुंदरीला भेट देईन आणि तिचं प्रेम संपादन करीन!

आरव: अरे मूर्खा, तो एक अलंकार आहे.

विदूषक: मीही तेच म्हणतोय्. मोती हे अलंकार नाहीत का?

आरव: अरे गाढवा, तो भाषालंकार आहे. शेतकरी जेव्हा घाम गाळून शेतात काम करतो तेव्हा मोत्यांच्या दाण्यासारखी कणसं पिकतात असं लेखक-कवी म्हणतात!

विदूषक: अस्सं होय? मला वाटलं…

आरव: छे, तुझ्यासारख्या वेड्या माणसाशी बोलणं म्हणजे आपल्या वेळेचा अपव्यय. दुसरं काही नाही. (जातो. विदूषक पाहतच राहतो.)

**प्रवेश दुसरा**

(ललितेच्या प्रासादातील एक दालन.)

ललिता: (एका हाताने पुष्पगुच्छाशी खेळत तर दुसऱ्या हाताने गळ्यातील माळ कुरवाळत)

**पद ३**

*मी कुणावर करू प्रीत*
*दोघांवरही जडे जीव हा*
*हृदय धडधडे कसे पहा*
*एकास कसे मी निवडावे*
*आणि दुज्याला दुखवावे*
*मी कशि पाळावी रीत*
*मी कुणावर करू प्रीत...*

(प्रमोदिनी येते)

प्रमोदिनी: अय्या, राजकुमारींना कशानं तरी पछाडलेलं दिसतंय्…

ललिता: (भानावर येत) तुला काय करायच्च्यायत नसत्या उलाढाली? हे बघ मला महाराजांची काळजी वाटत्येय्. आपल्याला त्यांची भेट घेऊ दिली नाही राजवैद्यांनी. म्हणे त्यांना पूर्ण आरामाची गरज आहे. मग रणधीर आणि समरकेतूंना कसं बोलावून घेतलं? माझ्यावरची माया आटली का महाराजांची?

प्रमोदिनी: तसं नव्हे, ललिताजी. महाराजांचं तुमच्यावरही खूप प्रेम आहे—जणू लाडकी लेकच. म्हणूनच तर एवढा भव्य प्रासाद बांधून दिलाय् ना तुमच्यासाठी.

ललिता: पण मग रणधीर आणि…

प्रमोदिनी: (ललितेच्या कानाशी) मी ऐकलं की राज्यकारभाराबद्दल त्या दोघांना वेगवेगळं बोलावून महत्त्वाचं सांगितलंय् महाराजांनी.

ललिता: काय सांगितलं?

प्रमोदिनी: नक्की माहीत नाही पण बहुधा लौकरच युवराज समरकेतू उत्तरेकडे कूच करणार आहेत.

ललिता: अगबाई. ते कशाकरता?

प्रमोदिनी: उत्तरेकडच्या आपल्या मांडलिक राज्यामध्ये बंड झालंय्. ते मोडून काढण्याकरता युवराज समरकेतू ताबडतोब मोहिमेवर जाणार आहेत.

ललिता: म्हणजे राजधानीत लौकरच गडबड होणार. सैन्याची जमवाजमव... घोडे, हत्ती, उंट…

a

प्रमोदिनी: छे, छे. युवराज समरकेतू फक्त एका तुकडीनिशी निघणार आहेत. उद्याच. एवढे सैनिक पुरेत म्हणाले. तिथल्याच सैन्याला विश्वासात घेऊन बंडाचा बीमोड करणार म्हणाले.

ललिता: केवढा हा आत्मविश्वास. त्यांच्या शौर्याबद्दल तर शंकाच नाही.

प्रमोदिनी: पण... पण...

ललिता: प्रमोदिनी, हे पण... पण... काय?

प्रमोदिनी: पण युवराज रणधीर खट्टू झालेत.

ललिता: (काळजीच्या सुरात) आता ते कशानं बाई?

प्रमोदिनी: महाराजांनी त्यांना इथंच थांबून राज्यकारभारात मदत करायला सांगितलं आहे.

ललिता: (कपाळावर आठ्या) मग त्यात खट्टू व्हायचं काय कारण?

प्रमोदिनी: अहो राजकुमारी, त्यांनाही आपलं शौर्य गाजवायची संधी मिळाली नाही म्हणून.

ललिता: (सुस्कारा सोडीत) हं...

प्रमोदिनी: आता तुम्हीच त्यांच्या दु:खावर हळुवार फुंकर घाला (थोडं थांबून) तुमच्या प्रेमाची…

ललिता: (लटक्या रागाने चापट मारल्यासारखं करून) प्रमोदिनीऽऽ

प्रमोदिनी: युवराजांचं पण तुमच्यावर प्रेम आहे म्हटलं... तो पुष्पगुच्छ...

a

ललिता: मला तर बाई कळतच नाहीये. युवराज समरकेतूंनी पण मला ही मोत्यांची माळ अगदी गळ्यातून काढून दिली.

प्रमोदिनी: त्यांचं पण तुमच्यावर खूप प्रेम आहे.

ललिता: तेच तर. मलाच गोंधळल्यासारखं झालंय्.

प्रमोदिनी: पण तुमचं मन काय सांगतंय्?

ललिता: तिथंच तर गोंधळ आहे. प्रमोदिनी, प्रमोदिनी... पण कुणाला सांगायचं नाही हं.

प्रमोदिनी: इश्श, मी कशाला डांगोरा पिटायला जात्येय्.

ललिता: मला—मला ना दोघेही आवडतात.

प्रमोदिनी: पण त्यातल्या त्यात?

ललिता: त्यातल्या त्यातही दोघे आवडतात.

प्रमोदिनी: अगबाई. हे तर अवघडच होऊन बसलंय्.

ललिता: हे बघ. प्रमोदिनी, माझ्या जागी तू असतीस तर तू काय केलं असतंस?

प्रमोदिनी: (विचारात पडून) अं...अं... काय बरं केलं असतं?

(थोडा वेळ येरझारा घालते. इकडे ललिता अस्वस्थ)

ललिता: काय हे प्रमोदिनी? किती वेळ? सांग ना पटकन्.

प्रमोदिनी: (एकीकडे) बाईसाहेबांच्या उभ्या जीवनाचा प्रश्न. अन् मला लागलीच उत्तर मागतायत… हं:

ललिता: काय ग प्रमोदिनी, काय म्हणत्येयस?

प्रमोदिनी: काऽही नाही. विचार करत्येय्.

ललिता: किती ताणशील ग माझी उत्कंठा?

प्रमोदिनी: हां. म्हणजे राजकुमारी असं बघा—मी हातचं सोडून पळत्याच्या पाठीमागं नसते गेले.

ललिता: म्हणजे काय ग? जरा नीट सांगशील की नाही?

प्रमोदिनी: म्हणजे... म्हणजे. आता कसं सांगू? (थोडासा विचार करून) आता युवराज समरकेतू मोहिमेवर निघालेत. ते काही लौकर परत येणार नाहीत. ते तिथंच सैन्याची जमवाजमव करणार; युद्ध करणार; तिथल्या राज्यकारभाराची घडी नीट बसवणार आणि मग येणार. समजा काही वर्षं गेली तर... तर...

ललिता: तर काय?

प्रमोदिनी: तोपर्यंत तुम्ही वाट पाहणार का? किती वर्षं लागतील हेही सांगता येत नाही. शिवाय लढाईवरचा माणूस—परराज्यात गेलेला. त्याचा काय भरोसा?

ललिता: (किंचितशा रागाने) प्रमोदिनीऽऽ

प्रमोदिनी: म्हणजे, मला असं म्हणायचंय् की तिथल्या राजानं खूष होऊन आपल्या कन्येचा विवाह त्यांच्याशी लावून दिला किंवा त्यांचंही मन इतका काळ दूर राहिल्यावर कुणा राजा-उमरावाच्या मुलीवर बसलं तर काय करणार? तुम्ही इथं उपाशी (जीभ चावते)—म्हणजे प्रेमाची परीक्षा करीत बसणार...

ललिता: मग?

प्रमोदिनी: युवराज रणधीर इथंच राहणार आहेत. त्यांचंही तुमच्यावर प्रेम आहे. आज ना उद्या ते राजे होणारच आहेत. तेव्हा...

ललिता: कळलं, कळलं. (स्वगत) प्रमोदिनी म्हणत्येय् त्याच्यात तथ्य आहे खरं.

**प्रवेश तिसरा**

(ललितेच्या प्रासादातील एक दालन. ललिता मंचकावर बसलेली आहे. आरशात निरखून पाहत आहे. रणधीर येतो.)

रणधीर: अरे वा. फार वेळ पाहू नकोस, ललिता. दृष्ट लागेल—आरसा फुटेल...

ललिता: (लाजते) इश्श.

रणधीर: उद्या संध्याकाळी नदीकाठच्या उद्यानात भेटशील का? एकांतात? तुझी ती लुडबूड करणारी प्रमोदिनी नको हं बरोबर.

ललिता: आ-आवडेल मला.

रणधीर:

**पद ४**

*तुझे हृदय मज आज गवसले*
*तव प्रीतीचे दान मिळाले*
*किती दिवस ते आले गेले*
*प्रीतीचे मज गमक लाभले*
*या सूर्याला साक्षी ठेवुन*

a

*तुला सदैव मी संगत देइन*

*अंतरिच्या गाभाऱ्यामधि ठेवुन*

*राज्याची सम्राज्ञी बनविन!*

(गाता गाता आपला शेला काढून फिरवतो. तो तिथेच पडतो.)

ललिता: (मान वेळावत) अगदी इतकं नको चढवून ठेवायला. ऐन वेळी पुरुष वचनं विसरतात. अगदी दुष्यंतासारखा मोठा राजा देखील विसरलाच ना वचन?

रणधीर: नाही... तसं होणार नाही.

(पडद्याआड गलबला. प्रमोदिनीचा आवाज: *राजकुमारी, राजकुमार समरकेतू येतायत*)

ललिता: अगबाई. अं...

रणधीर: असू दे. असू दे. मी निघतोच. (स्वगत) समरकेतू कडमडला वाटतं इथे? कधी माझ्यामागचं हे शुक्लकाष्ठ संपणारे माहीत नाही. मोहिमेवर जाण्याआधी भेटायला आला असेल. तिथेच राहा म्हणावं नाहीतर युद्धातच... अरेरे असा दुष्ट विचार कशाला? पण याचा काहीतरी बंदोबस्त केलाच पाहिजे. (जीभ चावतो. शेला तिथेच विसरून जातो.)

समरकेतू: (प्रवेश करतो. ललितेचं लक्ष नाही. ती आपल्याच विचारात गुंग. ती शेला छातीशी घट्ट धरून इकडे तिकडे तो ठेवण्यासाठी पाहत राहते) ललिते, मी निरोप घ्यायला आलोय्. (समरकेतूचं लक्ष शेल्याकडे

a

जातं.) (स्वगत) हा तर रणधीरचा शेला. रणधीर येऊन गेलेला दिसतोय्. आणि ललिता पण त्याचा शेला हृदयाशी खूप घट्ट धरून आहे म्हणजे...

ललिता: (गोंधळून) अं, काय?

समरकेतू: काऽही नाही. मी निरोप घ्यायला आलोय्.

ललिता: अं? हं, हं. निरोप—निरोप कसला?

समरकेतू: महाराजांनी उत्तरेकडचं बंड मोडून काढायला मोहिमेवर जायला सांगितलंय्. अशा बंडांचा नि:पात करायचा असेल तर उशीर करून चालत नाही. म्हणून आज्ञा होताच ताबडतोब निघतोय्.

ललिता: अभिनंदन!

समरकेतू: अभिनंदन? ते कशाकरता बुवा?

ललिता: महाराजांनी एवढी मोठी जबाबदारी तुमच्यावर टाकलीय्.

समरकेतू: कुणाला तरी ही जबाबदारी घ्यावी लागणारच नाही का? महाराजांनी इथल्या कारभारामध्ये रणधीरला लक्ष घालायला सांगितलंय्. ती पण जबाबदारीच नाही का? मला तर वाटतं ती युद्धापेक्षा अवघड गोष्ट आहे. (स्वगत) मात्र त्याला जबाबदारीची जाणीव आहे की नाही कुणास ठाऊक!

ललिता: हो, पण राज्यकारभाराचं वेगळं आणि लढाईचं वेगळं. लढाईची जबाबदारी जास्त महत्त्वाची. शिवाय सैन्याला इथून तिथपर्यंत घेऊन जायचं आणि लढायला प्रवृत्त करायचं म्हणजे अवघड काम आहे.

समरकेतू: नाही, मी सैन्य घेऊन जात नाहीय्.

ललिता: मग?

समरकेतू: ते राज्य आपलं मांडलिक राज्य आहे. शत्रुजित महाराजांच्या सेनेतल्या काही अधिकाऱ्यांनी बंड केलंय्. मला एकनिष्ठ सैनिकांना हाताशी धरून बंड मोडून काढायचंय्. थोरले महाराजही म्हणत होते की सेना घेऊन जा पण मीच नाही म्हटलं. एकटं जाऊन शत्रुजित महाराजांच्याच सैन्याला विद्रोह्यांचा पाडाव करायला लावणं यातच सामर्थ्य आणि खरा पुरुषार्थ आहे असं मला वाटतं. महाराजांचा आशीर्वाद मिळाल्यावर तर आत्मविश्वास आणखीनच वाढला. पण महाराजांनी दहा-बारा सैनिकांना बरोबर घेऊनच जायला सांगितलं.

ललिता: अगबाई, तुमच्या पराक्रमाचं कौतुकच करायला पाहिजे.

समरकेतू: अहो बाईसाहेब, पराक्रमाला अजून अवकाश आहे. आताशी तर आम्ही तयारीत आहोत.

**पद ५**

*ज्येष्ठांचे आशीर्वाद मिळाले*
*मनाजोगते कार्य मिळाले*
*तरी अजुनि मज असे वाटते*
*काहितरी अवशिष्ट राहिले*

ललिता: काय राहुन गेलं?

समरकेतू:

a

## पद ६

*प्रीतीच्या हाकेला माझ्या*
*मिळेल जर प्रतिसाद*
*करील वर्धित पराक्रमाला*
*शत्रू होइल बाद*
*मिळेल समशेरीला पाणी*
*बंडावर आघात*
*शत्रूला मग धूळ चारुनी*
*उतरवीन उन्माद*

ललिता: (गोंधळून—स्वगत) अगबाई. काय करावं बाई तरी आता? इकडे रणधीर आणि तिकडे समरकेतू. दोघेही उदंड प्रेम करतायत माझ्यावर.

समरकेतू: ललिते, मला निदान शुभेच्छा तरी देशील की नाही? का अशी स्वत:शीच काहीतरी पुटपुटत राहणारेस?

ललिता: नाही, नाही. हं—हो यशस्वी होऊन परत या. विजयश्रीची माला गळ्यात घालून तुम्ही आलेलं मला डोळे भरून पाहायचंय्.

समरकेतू: विजयश्री मालेवरून आठवलं—किती छान दिसत्येय् तुला ही मोत्यांची माळ?

ललिता: (पुन्हा गोंधळून) अं—हं.

समरकेतू: मला एक वचन दे, ललिते.

ललिता: वचन, कसलं वचन?

a

समरकेतू: तुला ही माळ आवडल्येय् ना? नक्की आवडल्येय् ना?

ललिता: हो, का?

समरकेतू: मग मला वचन दे की मी येईतोपर्यंत तू ती गळ्यातून काढणार नाहीस...

ललिता: हो. पण का बरं?

समरकेतू: म्हणजे जेव्हा तू आरशात स्वत:ला पाहशील तेव्हा ही माळ तुला दिसेल आणि माझी आठवण येईल. (स्वगत) फुलं काय कोमेजून जातील आणि त्यांचं निर्माल्य होईल. पण मौक्तिकरत्नं म्हणजे आयुष्यभराची आठवण आहे!

ललिता: असं होय? ठीक आहे.

(दुरून तुतारीचा नाद ऐकू येतो. आरव येतो.)

आरव: युवराज, घोडेस्वार तयार आहेत. तुमचाही अश्व अयन तयार आहे. आता निघायला हवं.

समरकेतू: ललिते, निघतो मी. विसरू नकोस मी सांगितलेलं. महाराजांची काळजी घे. (ललितेचा हात हातात घेतो. ललिता लाजते पण स्मितहास्य करते. समरकेतू जातो.) आता शत्रूला धूळ चारायला मी तयार आहे.

a

## पद ७

*शिकवील खड्ग माझे*
*ऐसा धडा रिपूला*
*जाईल ना कधीही*
*तो आडवा कुणाला!*
*शिकवील...*

*दुष्टांस नष्ट करण्या*
*परचक्र रोखण्याला*
*झिजवीन देह माझा*
*निर्धार हाच केला!*
*शिकवील...*

## प्रवेश चौथा

(स्थळ: राजवाड्याबाहेरील उद्यान. ललिता प्रमोदिनीशी गप्पा मारत बसली आहे. रणधीर थोड्या अंतरावरून त्यांचं संभाषण ऐकतो आहे.)

ललिता: तर सगळं असं आहे बघ प्रमोदिनी. इकडे आता रणधीरनी बोलावलंय् तर समरकेतूनं ही मोत्यांची माळ कायम गळयात घालायला सांगितली आहे. मला ना काही कळतच नाहीये. रणधीरना इथं भेटायचं मी मान्य केलं. तर समरकेतूंचं आव्हान स्वीकारणं पण मला खूप भावलं.

प्रमोदिनी: पण राजकुमारी, तुम्हाला तर एकालाच निवडावं लागेल. दोघांशी कसं लग्न करणार आहात तुम्ही?

ललिता: अग पांचालीनं नाही का केलं पाच राजपुत्रांशी लग्न?

प्रमोदिनी: अहो पण तो काळ वेगळा होता—परिस्थिती वेगळी होती. आता होऊ शकतं का तसं? महाराजांना मान्य होईल का तसं?

ललिता: तेही खरंच. महाराजांना अजिबात दुखवून चालणार नाही. त्यांची तब्येतही नाजुक झाल्येय्... शिवाय समरकेतूंनीही महाराजांची काळजी घ्यायला निक्षून सांगितलंय्.

## पद ८

*मी कुणावर करू प्रीत*
*दोघे असती लोभसवाणे*
*आणि वागती प्रेमभराने*
*गाउ कुणाचे गीत*
*मी कुणावर...*

*एक धाडसी अन् पराक्रमी*
*दुजा कशातही नाहि कमी*
*नको हार अन् जीत*
*मी कुणावर...*

प्रमोदिनी: अहो राजकुमारी, असं किती काळ लोंबकळत ठेवणार आहात आपलं मन? करा निश्चय एकदा.

ललिता: तेच तर होत नाहीय् ना. पण प्रमोदिनी, आपण मुद्दाम इथं लौकर आलो. रणधीरनी एकांतात भेटायची इच्छा व्यक्त केल्येय्. तेव्हा तू आता जा.

प्रमोदिनी: हं. आता तरी ध्यानात येऊ दे किती प्रेम आहे त्यांचं तुमच्यावर. पण जाते मी. उगीच नको माझी लुडबूड दोन प्रेमिकांमधे.

ललिता: (लटक्या रागाने) प्रमोदिनीऽऽ.

(प्रमोदिनी जाते. ललिता पुन्हा मघाचेच पद गुणगुणत इकडे तिकडे करते. रणधीर प्रवेश करतो.)

रणधीर: (स्वगत) समरकेतूनं ललितेवर चांगलीच मोहिनी घातलेली दिसत्येय्. आता समरकेतूच्या अनुपस्थितीचा फायदा घेतला पाहिजे. हीच तिचं मन माझ्या बाजूला वळवायची संधी आहे. (उघड) वा:, वा:. ललिते, अगदी आनंदात दिसत्येयस्.

ललिता: मग? तुम्ही एवढं संध्याकाळी बागेत छानपैकी भेटायला बोलावलंत मग काय फुरंगटून बसू?

रणधीर: नाही, तसं नाही. पण ललिते, तू आनंदात असलीस ना की किती सुंदर दिसतेस... (आकाशातील चंद्राकडे बोट दाखवितो.)

**<u>पद ९</u>**

*चंद्र विलसतो बघ आकाशी*
*स्पर्धा करतो तुझ्या मुखाशी*

a

*त्या वेड्याला नाही माहित*
*कितीक जण ते तुजवर मोहित*
*असा कसा तू मूर्ख धाडशी*
*चंद्र विलसतो...*

*ओवाळिन मी सगळे तुजवर*
*तुजविण जगणे आहे अवघड*
*स्पर्शाचा मी तुझ्या अधाशी*
*चंद्र विलसतो...*

ललिता: अगबाई! एवढं प्रेम नका करू हं. मलाच सहन नाही व्हायचं.

रणधीर: का? (किंचित् चिडून) प्रेमाचा तिटकारा आहे का? की इतक्यातच माझ्या प्रेमाचा उबग आलाय्? (स्वगत) की समरकेतूनं एवढी मोहिनी घातल्येय्?

ललिता: (घाईघाईनं) नाही नाही. तसं काही नाही. इतकं प्रेम उतू नको जायला एवढंच मला म्हणायचं होतं.

रणधीर: नाहीतरी तुझाच विचार सतत माझ्या मनात घोळत असतो. मी तरी काय करू?

ललिता: तेच सांगत्येय्. महाराजांनी राज्यकारभारात लक्ष घालायला सांगितलंय् ना. असा नुसता माझाच विचार करत बसलात तर राज्याचा गाडा कसा हाकणार?

रणधीर: राज्याचा गाडा हाकला जाईल बरोबर. आहेत ना सगळे दिमतीला... चल इकडे बसू या इथल्या ताटव्यात. एकीकडे फुलांचा सुगंध आणि इकडे तुझ्या शरीराचा मादक गंध. अगदी बेहोष होऊन जाईन मी. (ललितेचा हात धरून जवळ ओढतो आणि ताटव्याकडे नेतो. रंगमंचावरचा प्रकाश हळूहळू कमी होत जातो.)

## प्रवेश पाचवा

(ललितेच्या प्रासादातील एक दालन. ललिता मंचकावर बसलेली आहे. प्रमोदिनी येते.)

ललिता: काय बाई करावं आता? काही सुचतच नाहीये.

प्रमोदिनी: असंच होतं नेहमी.

ललिता: म्हणजे काय प्रमोदिनी?

प्रमोदिनी: राजकुमारी, अहो—प्रेमात पडलं की असंच होतं.

ललिता: पण माझं मन कशातच लागत नाहीये.

प्रमोदिनी: कशात तरी मन गुंतवून घ्या म्हणजे मनाला स्वास्थ्य लाभेल.

ललिता: मग काय करू मी?

प्रमोदिनी: सांगते मी. पण अश्शी जाऊन अश्शी परत येते. (जाते.)

ललिता: अग पण... काय ते सांगशील की नाही? ही प्रमोदिनी पण ना—कधी कधी अगदी बरोब्बर सल्ला देते. पण कधी कधी असं वाटतं की तिनं जसं केलं असतं तसंच अगदी मी करायला पाहिजे असं नाही. म्हणजे

तिचा सल्ला कधीकधी बरोबर नाही असंही वाटत राहतं. ती तर म्हणते आहे की रणधीरवरच मी लक्ष केंद्रित करावं पण का कुणास ठाऊक मला काही तरी चुकल्यासारखं वाटतंय्. माझ्याकरता समरकेतूच योग्य आहे असं वाटत राहतं.

(प्रमोदिनी येते. तिनं पाठीमागे काही तरी लपवून आणलेलं आहे.)

ललिता: काय ग, काय आणलंयस?

(प्रमोदिनी मागे लपविलेला चित्रकलेचा संच दाखवते.)

ललिता: (आनंदाने) अय्या, खरंच की. छान वाटेल चित्र काढायला.

प्रमोदिनी: मग, मी सांगितलं होतं की नाही? यात तुमचं मन रमेल म्हणून. तुमच्या हातात कला आहे.

ललिता: प्रमोदिनी, तू खरंच किती सांभाळून घेतेस मला.

प्रमोदिनी: अहो राजकुमारी, मला तुमची काळजी घेतलीच पाहिजे.

ललिता: अग पण कसलं चित्र काढू मी आता?

प्रमोदिनी: या खिडकीतून थोरल्या महाराजांचा महाल दिसतोय् ना—त्याचं काढा.

ललिता: अग प्रमोदिनी, महाराजांची तब्येत ठीक आहे ना? अग मला तर राजवैद्य नेहमीच—"तुम्ही काऽही काळजी करू नका" असं म्हणतात आणि भेटू पण देत नाहीत.

प्रमोदिनी: तशी बरी आहे पण काळजी घ्यायला पाहिजे असं म्हणतात.

(ललिता डोळे पुसते.)

प्रमोदिनी: अहो, काय झालं?

ललिता: काही नाही. मनात जुन्या आठवणी दाटून आल्या.

प्रमोदिनी: कुठल्या आठवणी?

ललिता: अग, खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. माझे बाबा महाराज भृंगराज असेच आजारी होते. त्यातच शेजारच्या राज्याचं आक्रमण झालं. आमचं राज्य तसं लहान असल्यानं शत्रूच्या मानानं कमकुवत होतं. आमचे सेनापती युद्धात मारले गेले—अनेक सैनिकही धारातीर्थी पडले. महाराज भृंगराजांनी कृतवर्मा महाराजांना मदतीसाठी आवाहन केलं. कृतवर्मा महाराजांनी अतुलनीय शौर्य दाखवून शत्रूला पराभूत केलं. पण—पण—(पुन्हा ललितेचा कंठ दाटून येतो.)

प्रमोदिनी: (ललितेचे अश्रू पुसण्यासाठी रुमाल देते) पण काय राजकुमारी?

ललिता: (थोडीफार सावरून) पण भृंगराज महाराजांची तब्येत तोपर्यंत खूपच खालावली.

प्रमोदिनी: मग?

ललिता: मला अजूनही आठवतंय्. मी पाच सहा वर्षांचीच असेन तेव्हा. बाबांनी माझा एक हात धरला आणि दुसऱ्या हातानं कृतवर्मा महाराजांकडून वचन घेतलं.

प्रमोदिनी: कसलं वचन?

a

ललिता: माझा पोटच्या मुलीसारखा सांभाळ करायचा आणि आमच्या राज्याचंही रक्षण करायचं.

प्रमोदिनी: आणि ते महाराजांनी व्यवस्थितपणे पाळलंय्. खरंच आपलं राज्य किती सुदैवी आहे ना की महाराजांसारखे राज्यकर्ते आपल्याला लाभले आहेत?

ललिता: होय. खरंच.

प्रमोदिनी: आता हेच पाहा ना—युवराज समरकेतू महाराजांचे सख्खे पुतणे पण समरकेतूंच्या वडिलांच्या निधनानंतर कृतवर्मा महाराजांनी त्याचाही आपल्या मुलाप्रमाणेच सांभाळ केला—सख्ख्या मुलासारखंच प्रेम दिलं.

ललिता: सख्खा मुलगा रणधीर आणि पुतण्या समरकेतू यांच्यात कुठलाही भेदभाव केला नाही त्यांनी.

प्रमोदिनी: सांगितल्याशिवाय कळणारही नाही की एक मुलगा आहे आणि एक पुतण्या.

ललिता: आणि या सर्वावर कडी म्हणजे दोन वर्षांपूर्वी आपल्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर त्यांनी केलेली घोषणा...

प्रमोदिनी: हो ना की या दोघांत भविष्यात कुठलंही वितुष्ट येऊ नये म्हणून दोघांनाही ते राज्य विभागून देणार आहेत—होय ना?

ललिता: हो ना. महाराजांचं खरंच कौतुक करावं ते थोडंच!

a

## पद १०

*बहु असती आकाशामधि तारे*
*पण सूर्यापुढती फिकेच पडती सारे*
*महाराजांचे बाहू कणखर*
*हृदय तयांचे परंतु मृदुतर*
*उघडती पहा सुखाची द्वारे...*
*बहु असती...*

प्रमोदिनी: राजकुमारींना महाराजांची खूप आठवण येत्येय् असं दिसतंय्.

ललिता: हो अग, महाराजांची तब्येत ठीक झाल्याशिवाय चैन नाही पडणार मला. तू असं कर—कुणालाही न सांगता टेकडीवरील महालात माझ्याबरोबर राहा काही दिवस...

प्रमोदिनी: अहो पण...

ललिता: मी सांगत्येय् ना? मग कर तसं. पण कुणालाही कळता कामा नये. समजलीस?

प्रमोदिनी: जशी आज्ञा राजकुमारी.

ललिता: आणि हो, तुझ्याच सल्ल्याप्रमाणे मन गुंतविण्यासाठी तिथं चित्रं काढीन म्हणते—तेव्हा चित्रकलेचं साहित्य पण तिथं नेण्याची व्यवस्था झाली पाहिजे—गुपचूप.

प्रमोदिनी: होय राजकुमारी.

**प्रवेश सहावा**

(उद्यान. रणधीर एकटाच बसला आहे. मधूनच येरझारा घालीत आहे.)

रणधीर: (स्वत:शीच) काय करावं समजतच नाही. जिवाची नुसती घालमेल होत्येय्. असं वाटतं की समरकेतू विजयी होऊन आला तर पारडं फिरेल आणि ललिता हातची निसटून जाईल.

(पुन्हा येरझारा. बागेतली काही फुलं तोडतो.) ललितेला निरोप पाठवला तर ती तिच्या दालनात नाही अन् कुठं गेल्येय् तेही माहीत नाही. मला शंका आहे की त्या समरकेतूनंच ललितेवर असं काही मायाजाल पसरवलंय् की ललिता धड मला स्वीकारतही नाही आणि नाकारतही नाही. त्या दिवशी उद्यानात मी तिचं चुंबन घ्यायचा प्रयत्न केला तर तिनं केवढा विरोध केला.

(अस्वस्थ शांतता)

समर तिकडे मोहिमेवर गेलाय्. तरीही त्याचं ललितेवर गारुड आहे असं दिसतंय्. काहीतरी जोरदार केलं पाहिजे म्हणजेच तिचं हृदय आकृष्ट करून घेता येईल.

(पुन्हा येरझारा)

पण ही ललिताही कुठं जाऊन बसल्येय् कुणास ठाऊक. काय करावं? हेर पाठवून ललिता कुठाय् ते शोधून काढावं का?

(विचारात)

पण नको. त्यालाही महाराजांची किंवा अमात्यांची परवानगी लागते. मृगयेला जावं म्हटलं तर मित्रमंडळींना कष्ट नको असतात—कोऽणी तयार होत नाही.

## पद ११

*संभ्रमात मी, विभ्रमात मी*
*मज काय करावे नकळे*
*भेटेना मज प्राणप्रिया*
*काम नसे अन् नाही मृगया*
*रिक्त मती, आसक्त वासना*
*सौख्य मात्र का दूर पळे...*
*संभ्रमात मी...*

*आयु चालली अशीच वाया*
*घडेल का मग काही किमया*
*निरुपयोगी सारे सगळे*
*का माझे अवसान गळे?*
*संभ्रमात मी...*

पण असं करून कसं चालेल? स्वस्थ बसूनही चालणार नाही. तसं मित्रमंडळींना गप्पा-गोष्टी, चैन नेहमीच आवडते. त्यांनाच बोलावून घ्यावं झालं. एका पायावर तयार होतील. म्हणजे मदिरापान, मेजवानी हे सगळं आलंच. काय हरकत आहे विरंगुळ्यासाठी हे सगळं केलं तर? चला, आज्ञा करून बोलावून घेऊ या मित्रवर्गाला!

(टाळी वाजवून) अरे, कोण आहे रे तिकडे? (आरव लगबगीनं येतो.)

आरव: आज्ञा असावी युवराज.

रणधीर: आमच्या महालात आज सायंकाळी विशेष भोज कार्यक्रमाची व्यवस्था करा. गौरमुद्रा नृत्यांगनेलाही बोलावून घ्या. शिवाय माझे नेहमीचे मित्र, सहकारी यांना या विशेष भोजनाला आमंत्रित करा.

आरव: जशी आज्ञा युवराज.

**प्रवेश सातवा**

(टेकडीवरील प्रासादातील एक दालन. ललिता चित्र काढीत बसलेली आहे. प्रमोदिनी येते.)

प्रमोदिनी: वा: राजकुमारी, चित्र काढायला घेतलंत वाटतं शेवटी?

ललिता: हं—घेतलंय् खरं पण तुला सांगते अजून कसलं काढावं तेच उमजत नाहीये. बरं, आपण इथे आहोत हे कुणाला कळलं नाहीये ना? कुणी पाळत ठेवताना सापडलाच ना तर त्याला जन्माची अद्दल घडवीन मी!

प्रमोदिनी: नाही हो, युवराज्ञी. तुम्हाला कशाला त्रास? कुणी तडमडलाच तर मीच देईन त्याला शिक्षा! पण या महालाचंच चित्र काढा की.

ललिता: महालाचं वगैरे नको हं—त्यात काही जिवंतपणाच नाही. चित्रात कसा जीव हवा.

प्रमोदिनी: हे मात्र खरं, राजकुमारी. मलाही पटतं—एखाद्या निर्जीव इमारतीचं चित्र काढण्यापेक्षा जिवंत गोष्टीचं काढणं जास्त योग्य आहे. (विदूषक येतो पण महालात प्रवेश करत नाही. तो गुपचूप खिडकीतून पाहत आहे. त्याच्याकडे अर्थातच ललिता आणि प्रमोदिनीचं लक्ष नाही.)

विदूषक: (स्वगत) मी—मी आहे ना जिवंत. माझं चित्र काढायला काय हरकत आहे? आणि माझा चेहरा पण किती गोड आहे. सांगतोच राजकुमारींना माझं चित्र काढायला. (पुढे सरसावतो पण लगेच दोन पावलं मागे येतो.) नको, नको. इथं मी अडमडलोय् ना. या दोघी अद्दल घडवतील, शिक्षा देतील मला. (चेहऱ्यावरून हात फिरवतो) आणि या—या गोंडस चेहऱ्याचं सगळं बाळसं नाहीसं होईल... आपण आपला काढता पाय घेतलेला बरा—मोडण्याआधी! (परत पावली फिरतो.)

ललिता: अग पण मग सुचव ना काही तरी.

प्रमोदिनी: (विचारात पडते.) अं—अं काय बरं चांगलं दिसेल... हां.

ललिता: (अधीरपणे) सांग ना.

प्रमोदिनी: पुढचे पाय वर घेतलेला घोडा.

ललिता: (विचार करीत) हं जिवंत चित्र होईल खरं. आणि पुढचे पाय वर घेतलेला घोडा म्हणजे वेग, चढाई—खराखुरा जिवंतपणा. पण...

प्रमोदिनी: आता पण कसला? विवाहाचा?

ललिता: उगीच फाजील विनोद करू नकोस हं, प्रमोदिनी.

a

प्रमोदिनी: मग घोडं अडलंय कुठं?

ललिता: अग घोड्याचं चित्र म्हणजे जरा अवघड आहे. एखादा घोडा समोर आणायला हवा. स्मरणावरून काढता येईल पण अवघडच आहे. आणि घोडा आणायचा इथं म्हणजे माझं इथलं राहणं गुप्त पण राहणार नाही.

(खिडकीतून विदूषक डोकावतो.)

विदूषक: (स्वगत) घोड्यापेक्षा मी नक्कीच बरा नाही का? कुणीतरी—हां तो आरवच—मला मध्ये एकदा गाढव म्हणालावता. आरवला सांगायला पाहिजे गाढव घोड्यापेक्षा किती गोंडस असतं. शांत असतं. घोडा पुढचे पाय वर करतो तर गाढव मागचे पाय एवढाच काय तो फरक. सांगावं का या दोघींना माझं चित्र काढायला? (विचारात पडतो.) नको, नको—या गाढवालाच लाथा बसायच्या!

प्रमोदिनी: मग आता काय करायचं?

ललिता: खरंच लहानशा वाटणाऱ्या किती तरी गोष्टी अवघड होऊन बसतात नाही?

प्रमोदिनी: खरंच. पण राजकुमारी, तुम्ही असं केलंत तर?

ललिता: कसं?

प्रमोदिनी: एखाद्या माणसाचंच चित्र का नाही काढीत तुम्ही?

ललिता: माणसाचं?

a

प्रमोदिनी: हं माणसाचं!

ललिता: कोणत्या माणसाचं?

प्रमोदिनी: एखाद्या सामान्य माणसाचं म्हणजे शेतकऱ्याचं, कामगाराचं किंवा सैनिकाचं चित्र काढायचं म्हणजे समोर तसं कुणीतरी पाहिजे...

ललिता: तूच तसा वेष करून बैस की माझ्यासमोर!

प्रमोदिनी: काय चेष्टा करताय् राजकुमारी. त्यापेक्षा तुम्ही माहितीतल्या एखाद्या आवडत्या माणसाचंच चित्र का नाही काढत? तुमच्या स्मरणशक्तीला ताण देऊन!

विदूषक: (खिडकीतून स्वगत) आता मात्र काय हरकत आहे? मी माणूसच आहे आणि सगळ्यांचा आवडता पण आहे की! महाराजांपासून सरदारांपर्यंत कुणाचीही करमणूक करणं आणि हसवणं माझं काम नाही का? पण नको रे बाबा, तो मार बसायला नको!

ललिता: म्हणजे?

प्रमोदिनी: (चेष्टेच्या सुरात) म्ह-ण-जे तुमच्या आवडत्या राजकुमाराचंच चित्र का नाही काढीत? बरं समजा--चांगलं-अगदी मनासारखं नाही आलं तर आपण ते दुसऱ्या कुणाचं आहे असं सांगू शकतो.

ललिता: किंवा नष्टही करू शकतो.

प्रमोदिनी: अगदी खरं. आता तुम्ही लागाच या कामाला.

ललिता: छान.

## पद १२

*काढू मी चित्र कशाचे—काढू मी चित्र कुणाचे*
*तो महाल भव्यसा मला खुणावत आहे*
*झुळुझुळू झरा तो तिथून वाहत आहे*
*पण मनात नसता माझ्या—का काढू चित्र तयाचे!*
*काढू मी चित्र कशाचे...*

*की अश्व देखणा आतुर आक्रमणाला*
*चैतन्य जणू ते आश्वासक चित्राला*
*याहून आगळे दृश्य मज आहे काढायाचे!*
*काढू मी चित्र कशाचे...*

*तो मनी प्रकटला स्वप्नीचा राजकुमार*
*त्यानेच करावा चित्रामधी विहार*
*मज विषय नवे मग नाही शोधायाचे!*
*काढू मी चित्र कुणाचे...*

(विचारात पडते. स्वगत) पण खरा प्रश्न तर तोच आहे. कोण आहे माझा आवडता राजकुमार? रणधीर की समरकेतू? पण हळू हळू चित्र काढायला सुरुवात तर करायला काय हरकत आहे. मनातलंच चित्रामध्ये काय उमटतं ते तर बघू.

(प्रमोदिनीला ललिताच्या मनातले विचार समजले असावेत अशा तऱ्हेने ती हसते.)

a

## प्रवेश आठवा

(उत्तररात्रीची वेळ. रणधीर आपल्या महालातच एकटा येरझारा घालीत आहे. पडद्यामागे बडबड आणि गलबला. स्वत: रणधीर किंचित् तोल गेल्यासारखाच चालतो आहे, मध्येच मंचकावर बसतो आहे.)

रणधीर: गेले एकदाचे सगळे. ही मौजमजा आणि विलासी जीवन जगताना खूप छान वाटतं. हां—पण नंतर खूप उदासवाणं वाटतं. मनामध्ये नैराश्य थैमान घालतं. हे करायला नको होतं असं वाटतं. पण... (दीर्घ विराम.)

पण काही दिवसातच पुन्हा पावलं त्या दिशेनंच पडायला लागतात. पुन्हा रात्र रात्र जागून जुगाराचा खेळ. तर कधी नाच-गाणं आणि त्या गणिकांबरोबर विलास. (पुन्हा दीर्घ विराम.)

आणि हे सगळं चालू असताना यथेच्छ मदिरापान.

आता उद्या सकाळी खूप उशिरा जाग येईल. मग पुन्हा नेहमीचा दिनक्रम. भोजनानंतर मित्रमंडळी गोळा होणार. मग पुन्हा सगळं तेच—जुगार, मदिरा, गणिका, नृत्य. हा समरकेतू जर मधे अडसर नसता तर किती छान झालं असतं! युद्धावर गेलाय्... तिथे काहीही होऊ शकतं... आपोआप ही खीळ नाहीशी होऊ शकते...

(पुन्हा विराम)

आणि समजा समर आपल्या मार्गातून नाहीसा नाही झाला तर? हा-हा अडसर आपणच दूर करावा का? छे, छे. काही झालं तरी आपलाच

भाऊ आहे तो... पण काही तरी करावंच लागणार (दीर्घ उसासा सोडतो. पुन्हा दीर्घ विराम.)

हे असंच कितीतरी दिवस चाललंय्. असं वाटतं की जीवनाला काही दिशाच नाही. हे असंच असतं का राजमहालातलं जीवन? काही तरी विसरण्यासाठी का हे सगळं करावं लागतं? समरकेतू जर मधे नसता तर हे काहीच करावं लागलं नसतं. माझी ललिता—फक्त माझीच राहिली असती.

## पद १३

*पिऊन मदिरा खुशाल पडतो सुकर्मांविना*
*तसेच बहु भक्षिण्या मनि वसे कशी भावना ।*
*अनेक ललनांसवे विहरलो इथे वा तिथे*
*मनी कुठुनशी अशी अवदसाच संचारते ॥*
*विलास करुनी सदैव थकलो नि कंटाळलो*
*असाच दररोज मी अति-अगम्य का वागलो ।*
*कितीतरि मनास मी पढविले तरी ते पहा*
*सुखासिन अशा जुन्याच वळणास जाई पहा ॥*

## प्रवेश नववा

(रणधीर बागेत अस्वस्थपणे येरझारा घालीत आहे)

रणधीर: बरं झालं आज तरी त्या दुष्टचक्रातून सुटका झाली. नाही तर नेहमीसारखंच आपलं गाडं सुरू—भोजन, मदिरा, जुगार, रात्री नृत्य आणि असलंच काही. सगळ्यांना सांगून टाकलं की मला बरं नाही

a

आणि कोणीही मला भेटायला येऊ नये—अगदी थोरल्या महाराजांना भेटायला येऊ नये असं राजवैद्य फर्मावितात तसं.

(जवळूनच प्रमोदिनी लगबगीनं आपल्याच नादात चालली आहे. तिचं आजूबाजूला फारसं लक्ष नाही. पण रणधीरचं तिच्याकडे लक्ष जातं.)

रणधीर: (हाक मारतो) प्रमोदिनी, प्रमोदिनी.

प्रमोदिनी: (भांबावून जात) युवराजांचा जय असो.

रणधीर: प्रमोदिनी, कुठं चाललीस इतक्या घाईनं.

प्रमोदिनी: (चाचरत) काही नाही, काही नाही. अशीच कामाला गेले होते. आता परत चालल्येय्.

रणधीर: प्रमोदिनी, ललिता कुठं आहे? सगळीकडे चौकशी केली. कुणालाच माहीत नाही. बाहेरगावी गेल्येय् का?

प्रमोदिनी: हं बहुतेक.

रणधीर: कुठल्या गावी गेल्येय्—अशी न सांगता? कधी येणार आहे माहीत आहे का?

प्रमोदिनी: अंहं.

रणधीर: (स्वत:शीच) ही अशी सांगणार नाही—काहीतरी शक्कल लढविली पाहिजे. (उघड, काही सोन्याच्या मोहरा काढीत) प्रमोदिनी, हे तुला खास बक्षीस. जरा चौकशी करून सांग की ललिता कुठं गेल्येय् आणि ती कधी परत येणार आहे ते.

प्रमोदिनी: (प्रमोदिनीचे डोळे लकाकतात पण ती खाली मान घालून उभीच राहते) युवराज, नाही. मी ही बक्षिसी नाही घेऊ शकत. आपली आज्ञा हेच आम्हा सेवकांचं बक्षीस आहे.

रणधीर: (प्रमोदिनीजवळ जाऊन तिच्या हातात मोहरा ठेवतो) पण आम्ही तुझ्या सेवेवर खूष आहोत. आता मला लौकरात लौकर सांग ललिताचा ठावठिकाणा.

प्रमोदिनी: (मोहरा मुठीत बंद करून ठेवीत) युवराज, नको, नको. मी असं काही तुमच्याकडून घेणं योग्य नाही.

रणधीर: प्रमोदिनी, आम्ही दिलेल्या उपहाराचा असा अवमान करू नकोस.

प्रमोदिनी: पण कुणाला कळलं तर काय म्हणतील...

रणधीर: कुणी काही म्हणालं तर सांग रणधीरनी दिल्येय् बक्षिसी म्हणून.

प्रमोदिनी: युवराज्ञी ललिता यांनी विचारलं तर?

रणधीर: पण ललिता बाहेरगावी गेल्येय् ना? तिची भेट व्हायला अवकाश आहे ना?

प्रमोदिनी: (जीभ चावते-स्वगत) चांगलीच अडकत होते की बोलण्यात.

रणधीर: काय?

प्रमोदिनी: काही नाही. विचारून सांगते. (झपाझप पावलं टाकीत निघून जाते.)

रणधीर: विसरू नकोस हां.

## प्रवेश दहावा

(टेकडीवरील प्रासादातील ललिताचे दालन. प्रमोदिनी येते. प्रमोदिनीचा चेहरा सचिंत. तिच्या हातात चित्रकलेचे साहित्य आहे.)

ललिता: बरं झालं तू आलीस. मी वाटच पाहत होते. ठेव ते साहित्य तिथं.

(प्रमोदिनी साहित्य एका मेजावर ठेवते आणि तिथंच उभी राहते.)

ललिता: काय ग प्रमोदिनी, अशी भेदरल्यासारखी का दिसत्येयस्? काय झालं?

प्रमोदिनी: (ललितेची नजर चुकवीत) कुठं काय? काही नाही.

ललिता: (तिला खुणेनं जवळ बोलावते. प्रमोदिनी जवळच उभी राहते. ललिता तिच्या खांद्यावर हात ठेवते) मोकळेपणानं बोल, प्रमोदिनी. नक्कीच काहीतरी झालंय्. तू नेहमीसारखी दिसत नाहीयेस.

(प्रमोदिनी काहीच बोलत नाही.)

ललिता: (प्रमोदिनीच्या पाठीवरून हात फिरवीत) सांग मला, प्रमोदिनी. सगळं मोकळेपणानं सांग. तू माझी जिवा-भावाची सखी आहेस.

(प्रमोदिनीच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात.)

प्रमोदिनी: (मुसमुसत) युवराज्ञी, माझ्या हातून प्रमाद घडलाय्.

ललिता: प्रमाद? कसला प्रमाद?

प्रमोदिनी: (हुंदके देत, थांबत-थांबत बोलते) युवराज्ञी, मी तुमचं—तुमचं चित्रकलेचं सा-साहित्य घेण्यासाठी—घेण्यासाठी...

ललिता: हां, बोल, प्रमोदिनी, घाबरू नकोस तुला माझ्याकडून अभय आहे.

प्रमोदिनी: मी—मी ते साहित्य घेऊन येण्यासाठी चालले असता बगीचात फिरत असलेल्या—असलेल्या युवराज रणधीरनी मला पाहिलं. त्यांनी मला हटकलं. त्यांनी मला तुमचा ठावठिकाणा विचारला.

ललिता: मग?

प्रमोदिनी: मी काहीच उत्तर दिलं नाही. मग ते खोदून खोदून विचारू लागले.

ललिता: अस्सं. बरं.

प्रमोदिनी: मग ते म्हणाले, "ललिता कुठं गावाला वगैरे गेल्येय् काय?"

ललिता: मग तू काय म्हणालीस?

प्रमोदिनी: (एक हुंदका देऊन) मी—मी म्हणाले, "बहुतेक."

ललिता: मग, योग्य तेच केलंस की तू अशा परिस्थितीत. मग कशाला काळजी करतेस.

प्रमोदिनी: नाही, मग त्यांनी माझ्या हातावर काही सोन्याच्या मोहरा ठेवल्या.

ललिता: (आश्चर्याने) अगबाई.

प्रमोदिनी: मी नको, नको म्हणाले तर ते म्हणाले की तू माझ्या उपहाराचा अवमान करू नकोस.

ललिता: अरे बाप रे.

प्रमोदिनी: मग—मग ते म्हणाले की चौकशी करून सांग की ललिता कुठं गेल्येय् आणि ती कधी परत येणार आहे ते.

ललिता: मग तू काय म्हणालीस?

प्रमोदिनी: मी—मी काय म्हणणार? मी बरं म्हटलं आणि ते पुढं काही बोलण्याच्या आधीच निघाले.

ललिता: हं. तू प्राप्त परिस्थितीत योग्यच केलंस. पण आता तू त्यांना उत्तर काय देणार?

प्रमोदिनी: हं, तेच तर मला कळत नाहीये.

ललिता: प्रमोदिनी, तुला एक गोष्ट सांगू?

प्रमोदिनी: अहो युवराज्ञी, आता माझं कसं होणार म्हणून मला काळजी वाटत्येय्!

ललिता: अग ऐक तर खरी. योगायोग असा की मी खरंच गावाला चालल्येय्. पण अजून कुणाला माहीत नाहीय्.

प्रमोदिनी: अगबाई, खरंच?

ललिता: खरं तर मीही काळजीतच आहे. माझ्या आईनं मला बोलावून घेतलंय्. पण माझी भेट गुप्त ठेवायला सांगितल्येय्.

प्रमोदिनी: म्हणजे तुम्ही वसुमती नगरीला चालला आहात का?

ललिता: हो. माझी आई रत्नमाला तिथंच राहते अजून. माझे वडील भृंगराज महाराज यांना आपल्या कृतवर्मा महाराजांनी वचन दिलं होतं की ते माझा मुलीसारखा सांभाळ करतील.

प्रमोदिनी: हां ते मला माहीत आहे.

ललिता: कृतवर्मा महाराजांनी भृंगराज महाराज गेल्यावर माझ्या आईलाही इथं येऊन राहायचं आमंत्रण दिलं होतं पण तिच्या तब्येतीला इथलं

हवामान मानवत नसल्यानं तिनं वसुमती नगरीलाच राहणं पसंत केलं. तशी मी अधून-मधून आईला भेटायला जात असते. पण आताची भेट जरा वेगळी आहे.

प्रमोदिनी: वेगळी? ती कशी काय?

ललिता: आता आईही थकल्येय्. तशी ती बरी आहे पण असं एकाएकी बोलावल्यामुळं मलाही जरा काळजी वाटत्येय्.

प्रमोदिनी: अहो खूप दिवसात भेट झाली नसल्यानं बोलावलं असेल. तुम्ही काही काळजी करू नका. सगळं काही ठीक होईल.

ललिता: पण मला एकटीलाच बोलावलंय् आणि थोरल्या महाराजांशिवाय कुणालाही सांगायचं नाही अशी सूचनाही आहे. अर्थात् कृतवर्मा महाराजांच्या परवानगीनंच मी चालल्येय्.

प्रमोदिनी: मग मी युवराज रणधीरना...

ललिता: त्यांना तू असंच सांगत राहा की ती गावाला गेल्येय् आणि लौकरच परत येत्येय् म्हणून.

प्रमोदिनी: पण त्यांनी फारच आग्रह केला तर?

ललिता: मग त्यांना सांग की मी वसुमती नगरीला गेल्येय् आणि लागलीच परत येणार आहे म्हणून. ते काही लगेच वसुमती नगरीला यायला निघणार नाहीत. आणि जरी अगदी ते निघाले तरी ते तिथं पोचेपर्यंत मी परत आलेलीही असेन.

प्रमोदिनी: ठीक आहे. जशी युवराज्ञींची आज्ञा.

a

ललिता: (चिंतातुर नजरेनं) पण प्रमोदिनी...

प्रमोदिनी: काय युवराज्ञी?

ललिता: नाही—काही नाही.

प्रमोदिनी: नाही युवराज्ञी ललिता, तुम्ही चिंताग्रस्त दिसताय्. बोला ना. मोकळं करा मन. तेवढंच हलकं वाटेल.

ललिता: खूप भय वाटतंय्. का असं एकाएकी आईनं बोलावलं असेल? तिची तब्येत तर ठीक असेल ना? शिवाय एकटीलाच बोलावलंय्...

प्रमोदिनी: अहो त्यांना काही महत्त्वाचं सांगायचं असेल.

ललिता:

**<u>पद १४</u>**

*माझ्या मनावरी हे*
*अज्ञात गूढ ओझे*
*आहे मनास चिंता*
*होईल काय माझे*
*एकांत भेटण्याला*
*आई निरोप धाडी*
*माझ्या मनास कैसी*
*पडती अनंत कोडी*

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

(टेकडीवरील प्रासादातील ललिताचे दालन.)

ललिता: (स्वत:शीच) खरंच काही समजत नाहीय् एकाएकी आईला का असं भेटावंसं वाटतंय् ते. काय दडलंय् या भेटीमागे त्याची काळजी आहे तसं दुसऱ्या बाजूनं थोडं बरंही वाटतंय्. रणधीरचा ससेमिरा तरी कमी होईल.

(खिडकीपाशी जाऊन बाहेर पाहते आणि विचारात पडते)

पण आताशी मला असं का वाटावं? रणधीरचा ससेमिरा का वाटावा? (थोडा अवधी.)

काही दिवसांपूर्वी आपल्याला रणधीर आवडत होता—आणि आताच का तो आवडेनासा नव्हे—त्याचा ससेमिरा वाटायला लागलाय्?

(पुन्हा थोडा अवधी)

त्यानं दिलेली फुलं आपण हृदयाशी धरून त्याला त्याच्या प्रेमाचा जवळजवळ स्वीकारही केला होता.

(पुन्हा थोडा अवधी)

पण तसं म्हटलं तर समरकेतूच्या मोत्याच्या हाराचाही मी स्वीकार केलाय्. ती सुद्धा प्रेमाची स्वीकृतीच म्हणायची का? सारखा गोंधळ होतोय्—रणधीर की समरकेतू? कुणा एकाला नाही म्हटलं तर रणकंदनच व्हायचं... प्रमोदिनी तर म्हणत होती की हातात असलेलंच खरं—बाकीच्याचा काही भरोसा नाही... पण अलीकडे रणधीरवरचं प्रेम कमी झालंय् आणि समरकेतू जास्त हवासा वाटू लागलाय् हे मात्र खरं... पण का असं? रणधीर नुसताच ऐश्वर्य उपभोगणारा, ऐदी झालाय् आणि तिकडे समरकेतू प्राणपणानं लढून महाराजांना दिलेल्या वचनाची पूर्ती करायला गेलाय्. खरंच, समरकेतूच खऱ्या क्षत्रियाप्रमाणे वागतोय्... पण महाराजांनी संधी समरकेतूला दिली तशी रणधीरला दिली असती तर कदाचित् रणधीरही... नाही, नाही. थोरल्या महाराजांना दोघांच्या गुणावगुणांची नक्की पारख असणार. म्हणूनच त्यांनी समरकेतूला रणांगणावर पाठवलं. महाराजांचं मूल्यांकन कसं चुकेल? (थोडा अवधी) ते काहीही असो. आता या गुंत्यात आईमहाराजांचं बोलावणं आलंय्. म्हणजे आणखी अवघड प्रकार...

## पद १५

*माझ्या मनावरी हे*
*अज्ञात गूढ ओझे*
*आहे मनास चिंता*
*होईल काय माझे*

*झाले असेल काही*
*चिंतेत टाकणारे*
*होईल दूर चिंता*
*जेव्हा कळेल सारे*

(प्रमोदिनी प्रवेश करते)

प्रमोदिनी: हे काय युवराज्ञी? अजून तयार नाही झालात?

ललिता: हे काय तयारच आहे मी.

प्रमोदिनी: अंहं. तुम्हाला वेष बदलायला हवा. साध्या गावंढळ मुलीसारखा.

ललिता: का?

प्रमोदिनी: अहो, का काय करताय? रणधीर अधीर होऊन तुमच्या शोधात आहे. तुम्ही दिसलात तर सगळंच मुसळ केरात.

ललिता: मग? काय करायचं? माझ्याकडे कुठंय् गावाकडच्या मुलीचा पोषाख?

प्रमोदिनी: काळजी नको. मीच माझ्याकडचा जुना धुतलेला पोषाख घेऊन आल्येय्. (पिशवीतून जुना पोषाख काढते आणि ललितेच्या हातात देते.) हा घाला नि माझ्या मागोमाग या. झाडीत पालखी ठेवल्येय् ती गुप्त मार्गानं तुम्हाला शहराबाहेर रथापर्यंत घेऊन जाईल. मग तो रथ तुम्हाला वसुमतीला घेऊन जाईल.

ललिता: हो, हो, प्रमोदिनी, निघायलाच हवं. उगीच रणधीरला कळायला नको. प्रमोदिनी, रणधीरनी चौकशी केल्यावर नीट सांगशील ना? आलेच मी

हे कपडे घालून. तिकडे आईसाहेबांनी काय वाढून ठेवलंय् ते पाहिलं पाहिजे. (आत जाते.)

**प्रवेश दुसरा**

(उद्यान. प्रमोदिनी लगबगीनं चालली आहे. तेवढ्यात रणधीर येतो. मद्यप्राशनामुळे किंचित हेलपांडत चालतो आहे.)

रणधीर: अरे वा:. मी-मी मला तुझीच आठवण आली होती आत्ता. मनात यावं आणि माणूस भेटावं. तु-तुला शंभर वर्षं आयुष्य आहे प्रमोदिनी. अग, मी कंटाळलोय् या निरर्थक जीवनाला... कुणीच नाहीय्—नाहीय् माझ्या जीवना-जीवनामधे र-रंग भरायला. ललिता-ललिता कुठं जाऊन बसल्येय कुणास ठाऊक. (काहीतरी आठवल्यासारखं करून) हां, हां. त-तूच म्हणाली होतीस न-ना की ललिता-ललिता गावाला गेल्येय् म्हणून?

प्रमोदिनी: (मद्याचा वास हातानं दूर करीत) होय, युवराज.

रणधीर: म-मग कुठं गेल्येय् ती? अन् कधी-कधी येणाराय् त्-ती?

प्रमोदिनी: युवराज्ञी वसुमती नगरीला गेल्यायत आणि आता त्या परत येण्याची वेळ झालीय्.

रणधीर: म्हणजे मला तिकडे जाऊनही उ-उपयोग नाही. ती-ती येईपर्यंत थांबलंच पाहिजे. पण किती दि-दिवस झाले—ती भे-भेटलीच नाहीय्. हा विरह सहन हो-होत नाहीय्.

प्रमोदिनी: मला वाटतं युवराजांनी आराम करावा.

रणधीर: आ-आराम? झ-झोपच येत नाही. या जिण्याला क-काही अर्थच नाहीय्. पोकळ जीवन! का-काहीच रंग नाही या आ-आयुष्यात. ए प्रमोदिनी, तू-तू येतेस का-का म-माझ्या महालात?

प्रमोदिनी: (दचकून) काय? मी? मी कशाला—म्हणजे-म्हणजे काय काम आहे?

रणधीर: अग, असं का-काय करत्येयस... सहजच. सहवासासाठी... (तिचा हात धरतो)

प्रमोदिनी: (लटपटते आणि हात सोडवून घेते) नको, नको. मला राजवैद्यांकडे जायचंय्. थोरल्या महाराजांसाठी औषधं आणायचीत.

रणधीर: ह-हात्तेच्या. मी दुसऱ्या कु-कुणाला तरी पा-पाठवायची व्यवस्था करतो. तू च-चल माझ्याबरोबर... (पुन्हा हात पकडायचा प्रयत्न करतो पण हेलपांडल्यामुळे पकडू शकत नाही.)

प्रमोदिनी: (लांब जाते) नको, नको. राजवैद्य माझ्यासाठी थांबलेत. उगीच विलंब झाला तर माझी खैर नाही. माफ करा, युवराज, पण मला गेलंच पाहिजे. (जाते)

रणधीर: काय हे-हे नशीब आमचं. आम्हाला एक सा-साधी दासीही मि-मिळू नये? आणि ललि-ललिता म्हणजे त-तर आता एक स-स्वप्नच झालंय्. (तिथल्याच एका आसनावर बसतो)

## **प्रवेश तिसरा**

(टेकडीवरील प्रासादातील ललिताचे दालन. ललिता एकटीच बसलेली आहे. तिच्या हातात एक लाखेनं बंद केलेली एक नक्षीदार पेटी आहे.)

ललिता: (हातातल्या पेटीशी खेळत) माझा तर बाई आई ठीक असलेली पाहून जीव भांड्यातच पडला. पण हे काय नवीन खूळ काढलंय् आईनं?

(थोडा अवधी.)

ही पेटी आधी थोरल्या महाराजांच्या स्वाधीन करायची—म्हणजे ती सुरक्षित राहील. माझ्या विसाव्या वाढदिवसाच्या दिवशी ही पेटी थोरले महाराज आणि काही महत्त्वाच्या लोकांसमोर उघडली जाईल. तशा अर्थाचा गुप्त खलिता थोरल्या महाराजांकडे यापूर्वीच आईनं धाडलाय् म्हणे.

(थोडा अवधी.)

ही पेटी उघडल्यावर योग्य तो निर्णय घ्यायला महाराजांना विनंती करण्यात आल्येय्. अन् आईनंही तसंच बजावलंय्.

### **पद १६**

*मन संभ्रमात आहे—पेटीत काय आहे*
*कसले गुपीत—बाई, कसले गुपीत आहे...*
*असतील काय आज्ञा दु:खात लोटणाऱ्या*
*आघात खोलवरती हृदयास घालणाऱ्या*
*अन् पोखरून खोल—काळीज दाहताहे*

a

*मन संभ्रमात आहे...*

*किंवा दया-कृपेचा उपहार तोषिणारा*
*की सैरभैर माझ्या मनसास शांतणारा*
*हे कूट का सुटेना—भाग्यात काय आहे*
*मन संभ्रमात आहे...*

*अन् कोणती समस्या आईस का सतावी*
*तिज मात्र शांतवाया खेळी कशी करावी*
*ही एक सारखी चिंता मजला सतावताहे*
*मन संभ्रमात आहे...*

(थोडा अवधी.)

म्हणजे अजून काही दिवस वाट पाहत राहायची दुसरं काय. पण मनाची घालमेल तर होत राहणारच. उत्सुकता ताणली जात्येय् क्षणोक्षणी आणि इथं तर खूप दिवस थांबायला लागणार आहे. प्रत्येक दिवस म्हणजे युगासारखा भासणार आहे.

(थोडा अवधी.)

उघडावी काय ही पेटी आत्ताच—कुणाच्याही नकळत? पण ही तर लाखेनं बंद केलेली आहे म्हणजे उघडली तर नक्कीच लक्षात येईल कुणाच्याही. काय करावं काही सुचेनासंच झालंय्.

(तितक्यात प्रमोदिनी प्रवेश करते. तीही घाबरलेली आहे. ती आलेली पाहताच ललिता पेटी मागे लपविते.)

प्रमोदिनी: काय युवराज्ञी, तुम्ही आलात वाटतं? काही वेळापूर्वी युवराज रणधीर तुमची चौकशी करीत होते. मला माहीत नव्हतं तुम्ही आलायत ते. मी त्यांना सांगितलं की तुम्ही यायची वेळ झालीय् म्हणून. तसंच ठरलं होतं ना सांगायचं?

ललिता: होय. पण अशी तू कावरी-बावरी का दिसत्येयस?

प्रमोदिनी: (चेहऱ्यावर उसनं हास्य आणून) छे, कुठं काय? तुम्ही येणार म्हणून चिंतेत होते थोडीशी.

ललिता: मी येणार म्हणून चिंतेत?

प्रमोदिनी: तसं नाही हो. तुम्ही येणार तेव्हा तुमचं चित्रकलेचं सगळं साहित्य व्यवस्थित आहे की नाही या चिंतेत होते. तेच बघायला आल्येय्. आल्यावर बाईसाहेबांना काही कमी पडायला नको. आणि तुमचं दालनही नीटनेटकं नको का ठेवायला?

(प्रमोदिनी ललितेच्या मागे जाते आणि पेटी पाहते.) हे काय?

ललिता: ते तुला काय करायचंय्? तू कामाचं बघ आपल्या.

प्रमोदिनी: ठीक आहे, युवराज्ञी. पण मलाही काहीतरी सांगायचं होतं. जाऊ दे ते आता. मी तरी कशाला सांगू?

ललिता: ए, प्रमोदिनी, असं काय करत्येयस ग? सांग ना मला...

प्रमोदिनी: तुम्ही मात्र लपवायचं. तुम्हाला कसली तरी पेटी उघडायचीय् हे मी आत येताना ऐकलंय्. पण जाऊ दे. असू दे तुमचं गुपीत तुमच्याजवळ. आम्ही काय दासीवर्ग. आमचं कोण ऐकणार?

ललिता: प्रमोदिनी, तू माझी दासी नाहीयेस—सखी आहेस. ए सांग ना काय तुझं गुपीत आहे? मी पण सांगीन मग माझं.

प्रमोदिनी: नाऽऽही. तुम्ही आधी सांगायचं—कारण मला ते अर्धवट माहीत आहे. तुमच्याकडे एक कुलूपबंद पेटी आहे आणि ती उघडण्यासाठी तुम्हाला कुतूहल आहे पण परवानगी नाही. होय ना?

ललिता: होय. पण तुला कसं माहीत?

प्रमोदिनी: अहो मी आत येत होते तेव्हा तुम्हीच तर म्हणत होतात—*मन संभ्रमात आहे—पेटीत काय आहे*

ललिता: हं, म्हणजे तू चोरून ऐकत होतीस तर.

प्रमोदिनी: वा: छान. मी मघाशीच नाही का सांगितलं की तुम्ही येणार म्हणून तुमचं चित्रकलेचं सामान नीट आहे की नाही ते पाहायला आणि तुमचं दालन नीट-नेटकं आहे की नाही ते बघायला मी आले होते.

ललिता: हं. प्रमोदिनी, तू जिंकलीस. मला आता सांगायलाच हवं.

प्रमोदिनी: बोला ना युवराज्ञी.

ललिता: अग, मी आईला—रत्नमाला राणीसाहेबांना—भेटायला गेले होते. त्यांच्या तब्येतीची चौकशी करायला. त्या ठीक आहेत पण त्यांनी ही पेटी माझ्या ताब्यात दिली आहे. ती महाराजांकडे द्यायला सांगितली आहे.

प्रमोदिनी: द्या ती माझ्याकडे. मी पोचवते त्यांच्याकडे.

ललिता: अग, घाई काय करत्येयस? नंतर सावकाश पोचव ती महाराजांकडे. मी वीस वर्षांची झाले की महाराज ही पेटी उघडतील आणि त्यात लिहिल्याप्रमाणे निर्णय घेतील.

प्रमोदिनी: मग?

ललिता: मला उत्सुकता आहे की काय असेल या पेटीत?

प्रमोदिनी: सांगू का? तुमच्या विवाहाबद्दलच असणार कारण तीच एक चिंता महाराजांना असणार?

ललिता: (डोळे वटारीत) प्रमोदिनीऽऽ, माझ्या विवाहाची महाराजांना चिंता? मला काय वर मिळण्याची चिंता आहे का?

प्रमोदिनी: तसं नव्हे युवराज्ञी. "सुयोग्य" वर मिळणं ही थोरल्या महाराजांच्या दृष्टीनं चिंता असू शकते. त्यासाठी आपल्या आईसाहेबांनी काही सूचना केल्या असतील...

ललिता: हां—हे एक असू शकेल. पण रणधीर आणि समरकेतू असताना...

प्रमोदिनी: हॅ: रणधीर... (जीभ चावते)

ललिता: का ग प्रमोदिनी, तूच तर मला सल्ला दिला होतास ना—हातचं सोडून पळत्याच्या पाठीमागं जायचं नसतं म्हणून. मग आता का रणधीरचं नाव आल्याबरोबर हॅ: करत्येयस?

प्रमोदिनी: काही नाही, युवराज्ञी.

ललिता: तू काहीतरी लपवत्येयस. अन् तुझं गुपीत पण सांगत्येयस ना?

प्रमोदिनी: (चिंताग्रस्त होऊन एकीकडे)

**पद १७**

*भीती का वाटते—मजला भीती का वाटते*
*सांगावे का युवराजांनी*
*केली मजवरि आक्रमणे*
*ललिताजींना या दासीचे*
*पटेल का हे माझे म्हणणे*
*की होत्याचे होइल नव्हते*
*भीती का वाटते—मजला भीती का वाटते*

ललिता: प्रमोदिनी, काय विचारत्येय् मी? तुझं गुपीत सांगणार आहेस की नाही?

प्रमोदिनी: (सुस्कारा सोडीत) युवराज्ञी, तुम्ही रागावणार नाहीत ना माझ्यावर?

ललिता: रागवीन कशी मी तुझ्यावर? तू सखी आहेस ना माझी?

प्रमोदिनी: पण…

ललिता: पण काय?

प्रमोदिनी: आता-आता म-मी जे तुम्हाला सांगणारे न-ना त-ते…

ललिता: अग अशी घाबरत्येयस का? सांग नीट काय ते.

प्रमोदिनी: युवराज्ञी, ते य-युवराज र-रणधीर यांच्याबद्दल आहे. आणि-आणि त-ते चांगलं नाहीये...

ललिता: अगबाई! सांग, सांग.

प्रमोदिनी: पण खरंच ना तुम्ही माझ्यावर रागावणार नाही?

ललिता: अग, खरंच नाही रागावणार—आता सांग.

प्रमोदिनी: अहो मी उद्यानातून चालले होते तेव्हा मला युवराज रणधीरनी हटकलं.

ललिता: काय म्हणाले ते?

प्रमोदिनी: अहो पहिल्यांदा त्यांनी तुमची चौकशी केली.

ललिता: चौकशी म्हणजे?

प्रमोदिनी: म्हणजे तुम्ही कधी येणार आहात त्याची चौकशी.

ललिता: मग, काय सांगितलंस?

प्रमोदिनी: मी म्हणाले—तुम्ही वसुमती नगरीला गेला आहात आणि आता तुमच्या परतण्याची वेळ झाली आहे.

ललिता: हो तसंच सांगायचं ठरलं होतं कुणी विचारल्यावर.

प्रमोदिनी: हं. पण, पण...

ललिता: अग, पण-पण काय करत्येयस? सांग पुढं काय झालं ते.

प्रमोदिनी: युवराज्ञी, माझ्या असं लक्षात आलं की युवराजांनी म-मदिरापान केलेलं होतं आणि ते जरा ज-जास्तच झालेलं होतं.

ललिता: अग प्रमोदिनी, तू काय सांगत्येयस हे? कुणाबद्दल बोलत्येयस हे माहीत आहे ना तुला?

a

प्रमोदिनी: होय, युवराज्ञी. मी तुमची शपथ घेऊन सांगते—हे सगळं जसं घडलं तस्सं मी तुम्हाला सांगत्येय्.

ललिता: (सुस्कारा सोडून) हं.

प्रमोदिनी: म्हणाले की मला स्त्री सहवासाशिवाय जगताच येत नाही. आणि-आणि—(स्फुंदू लागते)

ललिता: (प्रमोदिनीचा खांदा थोपटीत) सांग, सांग—रडू नकोस.

प्रमोदिनी: त्यांनी—त्यांनी माझा हात धरला आणि जवळ ओढलं.

ललिता: अरे बाप रे. भयंकरच.

प्रमोदिनी: पण-पण मी कशीबशी निसटले तिथून.

ललिता: कठीणच परिस्थिती झालीय्. आणि मी तर...

प्रमोदिनी: युवराज्ञी, मला जाऊ द्या. मला नाही सहन होत हे...

ललिता: ठीक आहे. जा तू. (प्रमोदिनी जाते.)

## <u>पद १८</u>

*मनास अजुनी मुळीच नकळे कसे व्हायचे*
*रहस्य उमगेल ते अजुनि स्वल्प काळामधे*
*लगेच उघडीन कोश मग गुह्य पाहावया*
*हवेच मज मात्र ते अजुनि धैर्य राखावया*

## प्रवेश चौथा

(रणधीरचा महाल. रणधीर एकटाच मद्यप्राशन करीत बसला आहे.)

रणधीर: छे. खरंच जीवन व्यर्थ आहे. नशिबानं राजघराण्यात जन्म झाला त्याचं सार्थक करायचं सोडून मी विलासातच रमून गेलोय्. हाच का पुरुषार्थ? (एक घुटका घेतो. अवधी.)

पण काय करू. मनात येणाऱ्या नैराश्याला विसरून जायला हेच मद्य उपयोगी पडतं. आणि दुर्दैव असं की त्या गुंगीतून बाहेर पडलं रे पडलं की पुन्हा आग्या मोहोळासारखे तेच तेच विचार मनाला डंख करू लागतात. (अजून एक घुटका घेतो. अवधी.)

हां. आता मात्र मन हलकं हलकं व्हायला लागलंय्. (अवधी. थोडासा हेलपांडत येरझारा घालतो. मंचकावर झोकून देऊन झोपल्यासारखा पडतो.)

मला ख-खात्री आहे क-की मी मी जागा झाल्यावर न-नेहमीसारखं नैराश्य काळजात थैमान घालील. क-काय आहे उतारा याच्यावर? (अवधी. लोळतो.)

हां, हां. अवश्य एक म-मार्ग आहे. (जवळचा चषक उंच धरतो.) या-या मद्याहून अधिक शक्तिशाली मद्य—हाच उ-उतारा आहे यावर. म्हणजे नैराश्य आणखी दूर जाईल. ख-खरंच अ-आणखी जालीम मद्य आ-आणलं पाहिजे. (चषक हातात फिरवीत राहतो. अवधी.)

छे, छे, छे. ह-हे काही ख-खरं नाही. याच्याहून—म्ह-म्हणजे जगातलं स-सर्वात शक्ति-शक्तिशाली मद्य आणलं प-पाहिजे—स-सगळं नैराश्य द-दूर करणारं...

(पुन्हा येरझारा घालण्याचा प्रयत्न करतो पण फारसं नीट चालता येत नसल्यानं मंचकावर येऊन पहुडतो.)

स-सर्वात शक्तिशाली--सर्वात श-शक्तिशाली...

(पुन्हा पुन्हा तेच पुटपुटतो.)

सर्वात शक्तिशाली... अरेच्या... स-सर्वात श-शक्तिशाली असतं ते-ते व-विष... जे प-प्याल्यावर-क-कायमची न-निद्रा—अनंत क-काळची निद्रा येईल... नैराश्य न-नाही; स-सुख नाही; द-दु:ख नाही. स-सगळ्यापासून मुक्ती. तेच घ-घेऊन सर्व संपवलं पाहिजे.

## पद २०

*मी काय करूनी बसलो*
*जगण्याला लायक नाही*
*हे संपवितो मी जीवन*
*त्या कारण उरले नाही*

य-या मद्याचा क-काही उपयोग नाही—व-विष हेच या व्य-व्यथेवरचा उतारा अ-आहे. उद्या स-सकाळीच अ-अरण्याकडे मृगयेसाठी प्रस-प्रस्थान ठेवतो आ-आणि वाटेतल्या ध-धोत्र्याच्या झाडाच्या ब-बिया काढून आ-आणतो. म-म्हणजे क-कुणाला संशय या-यायला नको.

नंतर इ-इथं महालातच म-मद्याचे घु-घुटके घ-घेता घेता म-मृत्यूला-ला क-कवटाळावं...

(थकून निपचित पडतो.)

## प्रवेश पाचवा

(ललिता चिंताक्रांत. येरझारा घालत आहे.)

### पद १९

*मन माझे दुभंगले... मन माझे दुभंगले*
*ज्याच्यावरती केली प्रीती*
*तोच विसरतो सगळी नीती*
*काय करावे ते मज नकळे*
*मन माझे दुभंगले...*

*ज्याच्यावर विश्वास टाकला*
*त्याने का मग घात करावा*
*माझे तर अवसान गळे*
*मन माझे दुभंगले...*

(रणधीर प्रवेश करणार इतक्यात त्याला ललितेचे भाषण ऐकू येते तो ते खांबाआडून ऐकत राहतो—तिच्या नकळत)

मधून-मधून कानावर येतच होतं पण विश्वास नव्हता. पण आता मला खरंच कळत नाही—रणधीरनं असं का करावं? का रणधीर असा

a

वागला? उद्या समजा आमचा विवाह झाला आणि रणधीर मोहिमेवर गेले आणि मी माझ्यावर ताबा नाही ठेवू शकले तर ते त्यांना आवडेल का? मग हा खोटा पुरुषी अभिमान—की गर्व—का सहन करायचा?

(बसते)

छे, छे. जे काही माझं हृदय दोलायमान स्थितीत का होईना पण मधून-मधून रणधीरच्या बाजूनं झुकत होतं ते आता त्याचा तिरस्कार करू लागलंय्. पुरुषार्थाचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे समरकेतू. रणधीरनं राज्यकारभारात मदत करणं हेही सोपं काम नाहीये असं समरकेतू विनम्रपणे म्हणतात अन् इकडे कारभारात लक्ष घालण्याऐवजी रणधीर झुरत बसलेत अन् भोग-विलासात रममाण झालेत.

(पुन्हा येरझारा. खांबाआड रणधीर खिन्न होऊन मान खाली घालतोय्.)

समरकेतूंची पुरुषार्थाची कल्पना काय तर फक्त थोड्या सैनिकांनिशी परराज्यात जाऊन बंडाचा बीमोड करायचा. कुठे समरकेतूंचा पुरुषार्थ अन् कुठे रणधीरचा कामासक्त आणि स्वैर पुरुषी अहंकार. मीच त्यांना प्रीतीची आशा दाखवून चूक केली. मी आता काय करू?

(मटकन् मंचकावर बसते.)

हं—पण अवघड काम आहे. रणधीरला तर माझ्या प्रेमाची खात्रीच वाटत्येय्. मी तडकाफडकी काहीतरी बोलून बसले तर काहीतरी बरं-वाईट व्हायचं अन् राज्यावरच संकट यायचं. थोरले महाराज तर

a

उद्ध्वस्त होतील. त्यांनी मला स्वत:च्या मुलीसारखं वागवलं—अन् मी अशी परतफेड करायची? (अवधी)

रणधीरचं माझ्यावर प्रेम आहे हे नक्कीच. मीच काही तरी बोलल्यामुळे किंवा माझ्याकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यानं प्रेमभंग होऊन तो मद्याच्या आहारी जाऊन वाकडंतिकडं वागला असेल. पण मनुष्य चूक सुधारू शकतो—योग्य मार्गावर पुन्हा येऊ शकतो. त्याला पुन्हा संधी द्यायला हरकत नाही. कधीकधी माणसाला योग्य प्रतिसाद मिळाला नाही तर तो गोंधळून जातो—वेडंवाकडं वागू लागतो. छे, रणधीरची काहीच चूक नाहीये. चूक माझीच आहे. खरोखरीच मन, हृदय सगळं दुभंगलंय् माझं. (उशीत डोकं खुपसून मुसमुसू लागते. खांबाआड लपलेला आणि खिन्न झालेला रणधीर काहीसा समाधानी होऊन निघून जातो.)

**<u>प्रवेश सहावा</u>**

(रस्ता. गलबला. दुरून दवंडी ऐकू येत आहे. वेळ दुपारची)

दवंडी एक: ऐका हो ऐका. थोर जैन साधुपुरुष भवसागर महाराज नगरात आलेले असून दर्शनार्थी आणि उपदेशार्थींनी जैन मंदिरात त्यांना भेटण्यास यावे.

दवंडी दोन: समरकेतू महाराजांचे परराज्यातील मोहीम विजयी करून लवकरच नगरात आगमन होणार आहे. नागरिकांनी त्यांच्या स्वागतासाठी आणि विजयदिंडीत सहभागी होण्यासाठी वेगळी दवंडी होईल.

(आरव आणि प्रमोदिनी समोरासमोर येतात. नंतर ते आडबाजूला जाऊन बोलू लागतात.)

आरव: काय प्रमोदिनी. घाईत दिसत्येयस?

प्रमोदिनी: मग काय, तुझ्यासारखी मोकाट नाहीये.

आरव: मी मोकाट काय? तू तरी कुठं मोठी कामात गुंतल्येयस?

प्रमोदिनी: ॲहॅ. तुला काय? फक्त युवराजांना ते—ते पुरवायचं की आराम करायचा. (तोंडाशी अंगठा उंचावून मद्याची खूण करते.) मला राजकुमारींच्या सारखं पाठीमागे राहावं लागतं—त्यांना काय हवं नको ते पाहायला.

आरव: मोठी आल्येय् कामाची.

प्रमोदिनी: चल निघते मी. पुन्हा भेटू या. ही माहिती दिली पाहिजे युवराज्ञींना. विशेषत: मुनी भवसागर आल्याची.

आरव: का?

प्रमोदिनी: का काय, वेड्या. युवराज्ञींसमोर यक्षप्रश्न आहे आणि तू का म्हणून विचारतोयस? समरकेतू की रणधीर असं... (आपण चुकून बोलून गेलो ते लक्षात येऊन जीभ चावते.)

आरव: ओहो, असं आहे होय? म्हणजे मुनींकडून याबाबत उपदेश घेणार तर राजकुमारी.

प्रमोदिनी: ए आरव, असं कोंबडा आरवल्यासारखं करू नकोस. कुठं बोलू नकोस. मी चुकून बोलून गेले. चल, वचन दे.

आरव: पण हे बघ, बरंच काही घडतंय् राजकुमार आणि युवराज्ञी यांच्यामध्ये. आपण एकमेकांना सांगू आतल्या गोष्टी. काही भलतंसलतं घडण्याआधी आपण ते टाळू शकतो. होय की नाही? आणि मलाही तू वचन दे.

प्रमोदिनी: कसलं?

आरव: हेच की... आपलं—आपलं...

प्रमोदिनी: (लाजते) आपलं—आपलं काय करतोयस वेड्या? नीट सांग की.

आरव: तुला माहीत आहे मला तुझ्याकडून काय वचन पाहिजे ते. (प्रमोदिनी मुरकून पळून जाते.)

(विदूषक प्रवेशतो)

विदूषक: अरे, देवा. काय चाललंय् हे सगळं भोवती? आताच मी झाडाआडून ऐकलं... म्हणजे चोरून काही ऐकू नये हे खरं, पण मी काही पाठलाग करून हेतुपुर:सर ऐकलेलं नाही. आरव आणि प्रमोदिनी यांच्यात बऱ्याच काळापासून काहीतरी चाललंय् हे माहीत होतं. पण—पण ते जाऊ दे. तिकडे राजकुमारींना पर्याय आहेत—हा की तो—हा की तो. इकडे प्रमोदिनी आणि आरव यांचं प्रेम फुलत चाललंय्. एकूण

a

सगळीकडे प्रेमाचा ऋतू चाललाय? आणि (कपाळाला हात लावतो) आणि आमचं काय? कपाळच फुटकं... आमचा ग्रीष्म चाललाय्. सगळं शुष्क! खरं म्हटलं तर दुसऱ्याला आनंद देणारा माझ्यासारखा माणूस मिळायचा नाही. पण आमच्या नशिबात कुठंय् प्रेम? वेडंवाकडं गात सुटतो... *अमुचा ग्रीष्म, त्यांचा वसंत! कुणी करीना मला पसंत!!*

## प्रवेश सातवा

(पर्णकुटीत ललिता जैन मुनींसमोर बसली आहे.)

भवसागर: बोल बालिके, तुला काय सांगायचं आहे?

ललिता: मला माझ्या सखीनं—प्रमोदिनीनं—आपण नगराबाहेर या पर्णकुटीत राहत आहात आणि नागरिकांना मार्गदर्शन करीत आहात अशी वार्ता आणली. माझ्यासमोर एक यक्षप्रश्न उभा आहे आणि मला काय करावं ते कळत नाही. कृपया मला आपण मार्गदर्शन करा. (त्यांच्या पायावर डोकं ठेवते.)

भवसागर: आयुष्मान् भव. यशोमती भव. काय समस्या आहे तुझी?

ललिता: मी कृतवर्मा महाराजांची मानसकन्या आहे. महाराजांनी माझा लहानपणापासून सांभाळ केला आहे. महाराजांचे सुपुत्र आणि पुतणे असे दोघेही राजकुमार माझ्यावर प्रेम करतात. मीही दोघांवर प्रेम करते. आता विवाहासाठी त्यांच्यापैकी एकालाच मला निवडावं

लागेल. मी संभ्रमात आहे तेव्हा मी त्यातील एकाला कसं निवडावं त्यासाठी मला मार्गदर्शन करा.

भवसागर: (काही वेळ मुनी डोळे मिटून ध्यानस्थ होतात. ललिताही हात जोडून त्यांच्यासमोर उभी राहते. मग मुनी डोळे उघडतात.) बालिके, बस. (ललिता बसते.) तुला तुझ्या मनाला पटेल अशी दोघांच्या तुझ्यावरच्या प्रेमाची परीक्षा घ्यावी लागेल.

ललिता: कोणती परीक्षा, महाराज?

भवसागर: ते तुलाच ठरवावं लागेल. पूर्वी याकरता पण असत. आता हे दोघेच आहेत. ते जर तुझ्यावर मनापासून प्रेम करीत असतील तर ते साहस करायला तयार होतील. तिथेच तुला कळेल की कोण तुझ्यावर खरं आणि उच्च कोटीचं प्रेम करतो ते. जा, माझे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत. (ललिता नमस्कार करून जाते.)

## प्रवेश आठवा

(ललितेचा महाल. ललिता येरझारा घालीत आहे. प्रमोदिनी ललितेचा मंचक ठीकठाक करीत आहे. रणधीर प्रवेशतो. ललितेचं लक्ष नाही. दाराआड आरव आतील संभाषण ऐकत आहे.)

रणधीर: ललिते, अग आता लवकर माझ्या प्रेमाचा स्वीकार कर. आता महाराजांची तब्येत ठीक नसते, ते सारखे मागे लागलेत की—की...

a

ललिता: (सुरुवातीला दचकते पण नंतर सावरते.) मागे लागलेत की—की काय?

रणधीर: हेच की मी विवाह करून स्थिरस्थावर व्हावं आणि राज्यालाही स्थिरस्थावर करावं...

ललिता: रणधीर, तुमचं खरंच माझ्यावर प्रेम आहे?

रणधीर: अर्थात्! माझ्या प्राणापलीकडे.

ललिता: प्राणापलीकडे म्हणजे?

रणधीर: म्हणजे माझं तुझ्यावरचं प्रेम सिद्ध करायचं असेल आणि माझ्या जिवालाही धोका असेल तरी मी तो पत्करीन.

ललिता: ठीक आहे तर. मग तुम्हाला तुमच्या साहसाची परीक्षा द्यावी लागेल—माझ्यावरचं प्रेम सिद्ध करायला. (एकीकडे) काय सांगावं बरं ह्याला... साहस पाहूयाच किती दूरवर जातं ते... (प्रमोदिनी हे ऐकते.)

प्रमोदिनी: (जरा मोठ्यानेच) राजकुमारांना या सौधावरून उडी मारायला सांगा. चांऽऽऽगलं दहा हात तरी खोल असेल.

रणधीर: (मोठ्याने, दरवाज्यापाशी जाऊन—पलीकडे असलेल्या आरवला ऐकू जाण्यासाठी) सौधावरून खाली उडी मारायची? इथल्या सौधावरून? अवश्य. का नाही. अगदी इथल्या सौधावरून खाली उडी मारीन मी त्यात काय!

ललिता: अग, अग प्रमोदिनी, काय बोलून बसलीस हे? आता राजकुमार रणधीरनी हे दु:साहस केलं म्हणजे?

रणधीर: आता माघार नाही. मी सौधावरून उडी मारणार म्हणजे मारणारच. माझं प्रेम म्हणजे एवढं कच्चं आहे का? (दूरवरून एक अस्पष्ट टाळीचा आवाज ऐकू येतो. त्यासरशी रणधीरही टाळीचा आवाज काढतो आणि रंगमंचाच्या एका कडेला धावत जातो. काही क्षणांनी 'धप्प' असा आवाज येतो. ललितेचा चेहरा चिंताग्रस्त होतो. ती आणि प्रमोदिनी सौधापाशी—म्हणजे रंगमंचाच्या त्याच कडेला जातात.) प्रमोदिनी, काही दिसतंय् का? अंधारच आहे. रणधीरना खूप लागलं तर नसेल ना?

प्रमोदिनी: मलाही अंधारात काही दिसत नाहीये. मी जाऊन चौकशी करून येते.

ललिता: (काळजीयुक्त स्वरात) जा, जा लवकर जाऊन पाहा राजकुमार ठीक आहेत ना ते. (प्रमोदिनी जाते. ललिता येरझारा घालत राहते. अवधी. प्रमोदिनी येते.)

प्रमोदिनी: एका पायानं लंगडत चालताना दिसले. राजवैद्यांना बोलावलंय्. फार जास्त लागलं नाहीये. काही दिवसातच ठीक होतील असं सगळे म्हणतायत.

ललिता: बरं झालं बाई फार लागलं नाही ते. पण प्रमोदिनी तू असं बोलून गेलीस म्हणून—

प्रमोदिनी: राजकुमारी, तुम्हाला सुचत नव्हतं म्हणून मी सुचवलं. मला काय माहीत ते लागलीच उडी मारतील म्हणून.

ललिता: एका अर्थी बरंच झालं म्हणायचं. रणधीर परीक्षेत उत्तीर्ण झाले. आता मला समरकेतूंची परीक्षा घेतली पाहिजे.

(विदूषक प्रवेशतो.)

विदूषक: हे देवा, पाहतोयस ना तू काय चाललंय् ते? *पाहून अशी ही उडी, मला भरेल हुडहुडी!* मी लोकांना इतक्या उड्या मारून दाखवून हसवून सोडतो तरी मला प्रेम मिळत नाही... आणि इथे फसवून मारलेली उडीही प्रेम मिळवून देते! नाहीतर आमचं नशीब. (वेडंवाकडं गात सुटतो.) *असली फसवी उडी, आणील की जगबुडी...* (कोलांट्या उड्या मारतो)

## प्रवेश नववा

(रस्ता. गलबला. वेळ सकाळची. प्रमोदिनी आणि आरव समोरासमोर येतात.)

आरव: हे काय पुन्हा वाट अडवलीस? आता माझं काम नीट होणार नाही बघ.

प्रमोदिनी: असं का? मग आपलं—आपलं 'ते' झाल्यावर मी सारखीच समोर येणार मग?

आरव: 'ते झाल्यावर' म्हणजे काय?

प्रमोदिनी: चल, तुला माहित्येय्.

a

आरव: आज पहिल्यांदा तुझ्या तोंडून जरा चांगलं ऐकायला मिळालं. पण कुठं निघालीस लगबगीनं?

प्रमोदिनी: अरे, असं काय करतोयस? आज युवराज समरकेतू येणारेत. ऐकली नाहीस का दवंडी? जरा नीट कान देऊन ऐक. खूप कामं आहेत मला. चल वाट सोड. तुला नाही वाटतं काही काम आज एवढा धामधुमीचा दिवस असून?

आरव: अॅ हॅ, म्हणे तुला नाही वाटतं काही काम. मला तर थोरल्या महाराजांनी फाऽऽर महत्त्वाचं काम दिलंय्.

प्रमोदिनी: (वेडावून दाखवत) काय काम दिलंय् थोरल्या महाराजांनी? म-ह-त्त्वा-चं...?

आरव: अग, खूप महत्त्वाचं काम आहे. चल जाऊ दे मला.

प्रमोदिनी: वा रे वा. आपलं काय ठरलंय? एकमेकांना आतल्या गोटातलं सांगायचं म्हणून? मला थांबवून चौकशी केलीस आणि आता घाईत असल्याचं दाखवतोयस काय?

आरव: नाही अग खरंच. थोरल्या महाराजांनी भवसागर मुनींचा सत्कार करायला युवराज रणधीर यांना सांगितलंय्. तोच निरोप युवराजांना द्यायला मी चाललोय्. उन्हं वर चढतायत—मला वेळीच निरोप दिला पाहिजे. आणि तू कशाला घाईनं चालल्येस?

प्रमोदिनी: अरे आरव, युवराज समरकेतू आलेत ना? त्यांची—म्हणजे त्यांच्या प्रेमाची परीक्षा घ्यायच्येय् राजकुमारींना त्यासाठी निरोपा-निरोपी आहे.

आरव: बरं झालं सांगितलंस. युवराज रणधीरची परीक्षा घेतली त्यावेळी तू जी मदत केलीस ना त्याबद्दल ते खूष आहेत. त्यांच्या राजकुमारींच्या महालात येण्याच्या वेळी तू तिथं ठरल्याप्रमाणे होतीस आणि उडीचं सुचवलंस त्याबद्दल...

प्रमोदिनी: अरे पण सौधावरून उडी टाकल्यामुळे त्यांना काही फार लागलं नाही ना? कशी आहे तब्येत त्यांची आता?

आरव: अग खुळी की काय तू? मी दरवाज्याआडून ऐकत होतो. लगेच तिघांना घेऊन एक मोठी चादर सौधाखाली आम्ही धरली आणि रणधीरना अलगद झेललं. नंतर त्यांनी लंगडत असल्याचा थोडा अभिनय केला.

प्रमोदिनी: अगबाई अशी युक्ती केलीत काय तुम्ही लोकांनी!

आरव: पण समरकेतूंची काय परीक्षा घ्यायची ठरल्येय्?

प्रमोदिनी: काही नाही रे. एका पेल्यात विष आहे हे सांगून प्रेम खरोखरीचं असेल तर पिऊन दाखवा असं राजकुमारी त्यांना सांगणार आहेत.

आरव: अरे बाप रे! भयंकरच आहे. त्यापेक्षा सौधावरून घेतलेली उडी सोपीच म्हणायची!

प्रमोदिनी: अरे आरव की गाढव तू? राजकुमारी पेल्यात साधं सरबतच ठेवणार आहेत—म्हणजे मीच अलीकडच्या दालनात सरबत करून ठेवणार

a

आहे. मग मी ते महालात आणल्यावर युवराज्ञी त्यात एका बाटलीतून साधं पाणीच विष आहे असं सांगून ओतणार आहेत. सगळं खोटंखोटंच!

आरव: ओहो. असं आहे काय? मानलं पाहिजे राजकुमारींना!

(तेवढ्यात विंगेत घोड्याच्या टापांचा आवाज. आरव दचकतो.)

आरव: अरेच्या, ते काय स्वत: युवराज रणधीरच चाललेयत घोड्यावरून. त्यांना इथंच निरोप देतो—उगीच उशीर व्हायला नको. (हाक मारतो) युवराज रणधीर... युवराज रणधीर...

(आतून घोडा थांबल्याचा आणि रणधीर उतरल्याचा आवाज. रणधीर प्रवेश करतो.)

रणधीर: काय रे, मला रस्त्यात का थांबवलंस. हे माझ्यासाठी अपमानास्पद आहे असं तुला वाटत नाही? तुला यासाठी शासन होऊ शकतं.

आरव: क्षमा असावी युवराज. पण तितकंच महत्त्वाचं होतं म्हणून...

रणधीर: बरं, बरं. काय महत्त्वाचं सांगायचं आहे तुला? पटकन् सांग मला विश्रांती घ्यावयाची आहे.

आरव: थोरल्या महाराजांचा आपल्याला निरोप आहे. आपल्याला त्वरेनं भवसागर मुनींचा महाराजांच्या वतीनं सत्कार करायला सांगण्यात आलं आहे.

रणधीर: मला?

आरव: होय, आपल्यालाच, युवराज.

रणधीर: मी आताच मृगयेहून आलो आहे. मला विश्रांतीची गरज आहे. भवसागर मुनींना सायंकाळी राजवाड्याच्या मुख्य महालात बोलावून घ्या म्हणजे मी त्यांचा राजसिंहासनाचा मान राहील अशा रीतीनं सत्कार करीन.

आरव: क्षमा असावी युवराज. पण ते अशक्य आहे.

रणधीर: (संतापून) मूर्खा, तू तुझ्या मर्यादेच्या बाहेर चालला आहेस याची तुला जाणीव नाही का?

आरव: क्षमा असावी युवराज. परंतु खरोखरीच ते अशक्य आहे.

रणधीर: पण का?

आरव: एक तर थोरल्या महाराजांनी तुम्हाला व्यक्तिश: त्यांची भेट घेऊन सत्कार करावयास सांगितलं आहे आणि दुसरं म्हणजे मुनिवर महालात येणार नाहीत.

रणधीर: का?

आरव: भवसागर मुनी आणि इतर थोर जैन साधूंनी सर्वसंगपरित्याग केलेला असल्यानं ते राजवाड्यात आणि महालात प्रवेश करीत नाहीत. ते जैन मंदिरात किंवा सामान्य मनुष्याच्या झोपडीतच राहतात.

रणधीर: कमालच आहे. ठीक आहे. मग मी विश्रांती झाल्यावर पुढील काही दिवसात त्यांची भेट घेईन आणि त्यांचा सत्कार करीन.

a

आरव: हां  हे शक्य आहे. पण आपलं वेळापत्रक घाईचं होईल.

रणधीर: आता मात्र कमालच झाली. असा कसा मी सगळ्या बाजूंनी बांधला गेलो आहे? काय उपयोग या राजपदाचा?

प्रमोदिनी: (दुरूनच) युवराज, अनुमती असेल तर बोलू का? अभय असावं.

रणधीर: बोल आता. मला काही समजेनासंच झालंय्. बोल, बोल.

प्रमोदिनी: या सेवकाचा काही अपराध नाही. सायंकाळी मुनिवर कुणालाही भेटत नाहीत. शिवाय…

रणधीर: शिवाय काय?

प्रमोदिनी: लवकरच राजधानीच्या मुख्य चौकातून युवराज समरकेतूंची विजयदिंडी निघून राजप्रासादापाशी समाप्त होणार आहे. थोरल्या महाराजांनी याही कार्यक्रमाला जातीनं उपस्थित राहायला सांगितलं आहे. त्यामुळे आपण त्या प्रमाणे कार्यक्रम आखून जैन मुनींची भेट घेऊन महाराजांच्या वतीनं त्यांचं स्वागत करणं योग्य ठरेल.

रणधीर: (कपाळावर आठ्या) काय? समरकेतू आला—आले?

आरव आणि प्रमोदिनी: (एकसुरात) होय, युवराज. मोहिमेवरून नुकतेच यशस्वी होऊन आलेत ते.

आरव: शौर्यानं बंड मोडून काढलं त्यांनी.

प्रमोदिनी: आणि आपल्या सैनिकांचं अजिबात रक्त न सांडता विजयी झालेत ते.

a

आरव: थकलेत ते आणि विश्रांती घेतायत.

रणधीर: बरं, बरं. कळलं. (एकीकडे) ते विश्रांती घेतायत आणि मला विश्रांतीची गरज नाही काय? (उघड) ठीक आहे. मी बघतो काय करायचं ते. (आरव आणि प्रमोदिनी लगबगीने जातात)

**पद २१**

*या शब्दांना किंमत नाही*
*अंगाची हो लाही-लाही*
*संतापाने मस्तक फिरले*
*मन विदग्ध झाले, विषण्ण झाले*
*धिक्कार असो युवराजपदाचा*

*कोणालाही मी प्रिय नाही*
*अपमानित मी ठायी-ठायी*
*माझे जगणे किंवा मरणे*
*कुणास नाही देणे-घेणे*
*धिक्कार असो युवराजपदाचा*

(जातो.)

a

## प्रवेश दहावा

(३/४ सेट ललिताचा महाल आणि १/४ सेट महालाच्या शेजारील दालन. एका तिपाईवर प्रमोदिनी सरबत बनवीत आहे.)

प्रमोदिनी: हां, आता हे पेय तयार झालं. युवराज समरकेतूंचा निरोप आलाच आहे की ते थोड्याच वेळात येतील. तेव्हा माझं काम झालं. ते आले की राजकुमारींना हे नेऊन द्यायचं. बस्स. (चोरपावलांनी आरव प्रमोदिनीच्या मागे येतो आणि तिचे डोळे झाकतो.) कोण आहे? काय हा चावटपणा! (आरव प्रमोदिनीच्या डोळ्यांवरचे हात काढतो. प्रमोदिनी वळून बघते.) आरव, तू इथे कसा?

आरव: कसा म्हणजे? (दोन्ही हात डोक्यापासून खालपर्यंत नेतो) असा!

प्रमोदिनी: चहाटळपणा करू नकोस? कशाला आलास इथे?

आरव: (प्रमोदिनीच्या कमरेभोवती विळखा घालीत) तु-ला भे-टा-य-ला! (प्रमोदिनी क्षणभर सुखावते पण लगेच त्याचा विळखा सोडवते.)

प्रमोदिनी: चल, चल. कुणीतरी येईल आणि मग पंचाईत होईल.

आरव: बरं, बरं चलतो मी. पण लवकरच भेटशील ना? झाली का समरकेतू युवराजांच्या परीक्षेची तयारी?

प्रमोदिनी: (काहीशी आश्चर्यचकित होते आणि त्याला हलकेच दूर लोटते) हो, हो. पण आता तू जा. (आरव तिथेच घुटमळतो. तितक्यात ललिताची पलीकडे असलेल्या महालातून हाक ऐकू येते.)

ललिता: प्रमोदिनी, कुठे आहेस तू? मला जरा वस्त्रं निवडायला मदत कर.

प्रमोदिनी: (स्वत:शीच) युवराज समरकेतूंवर छाप पाडायचा विचार दिसतोय् युवराज्ञींचा! (उघड) आले, आले. (महालात जाते. इकडे आरव पोषाखात लपवलेली पुरचुंडी काढून त्यातील चूर्ण पेल्यात टाकतो आणि पेला हलवतो.)

आरव: (स्वगत) हां, युवराजांनी सांगितलेलं काम चोखपणे केलेलं आहे. आता बक्षिशीची अपेक्षा करायला हरकत नाही. (जातो.)

(महालात प्रमोदिनी उंची आणि आकर्षक वस्त्र ललितेला नेसवीत आहे. महालाच्या दुसऱ्या दरवाज्याबाहेर समरकेतू खाकरल्याचा आवाज काढतो.)

ललिता: अग बाई, आले वाटतं युवराज समरकेतू. (स्वत:ला नीटनेटकं करते.) या, या युवराज समरकेतू. आपलं स्वागत आहे!

समरकेतू: ललिते, कशी आहेस?

ललिता: मी ठीक आहे? तुम्ही विजयी होऊन आलात—बंड मोडलंत. महाराजांचा विश्वास तुम्ही सार्थ ठरवलात. अभिनंदन.

समरकेतू: (ललितेच्या गळ्यातील मोत्यांची माळ निरखून) ललिते, तू ही माळ नेहमी घालत्येस हे पाहून किती समाधान वाटलं. हीच माझ्या प्रेमाची खरी पावती आहे.

ललिता: अंहं.

समरकेतू: (आश्चर्यचकित होऊन) म्हणजे?

a

ललिता: तुमचं माझ्यावरचं प्रेम तुम्हाला सिद्ध करावं लागेल.

समरकेतू: ते कसं काय बुवा?

ललिता: समरकेतू, तुम्ही मोहिमेवरून आला आहात. तुमचं तिकडच्या राजांनी स्वागत केलं असेल. तिथेही देखण्या, लावण्यवती सुंदरी तुम्ही पाहिल्या असतीलच. तुम्हाला एखादीनं वशही करून घेतलं असेल. तुमचं माझ्यावरचं प्रेम तसंच आहे हे मला कसं कळणार?

समरकेतू: हं, पण मी वचन देतो ना…

ललिता: अंहं, नुसत्या वचनानं नाही भागायचं.

समरकेतू: मग मी काय करू म्हणजे तुझी खात्री पटेल, ललिते?

ललिता: माझ्या प्रेमाखातर काहीही करायची तयारी आहे?

समरकेतू: अवश्य.

ललिता: मी दिलं तर विष देखील प्राशन कराल?

समरकेतू: का नाही? तू तुझ्या हातानं मला दिलंस तर मी तेही प्राशन करीन!

ललिता: खरंच?

समरकेतू: अगदी खरं.

ललिता: प्रमोदिनी, आण ग ते समरकेतूंच्या स्वागतासाठी बनवलेलं पेय. मी स्वत: त्या पेल्यात विष घालते. बघूयाच युवराज खरोखरीच प्राशन करतायत की नाही ते. (प्रमोदिनी आतल्या दालनातून पेयाचा प्याला घेऊन येते आणि ललितेच्या हातात देते. ललिता त्या पेल्यात ‘विष’

असं लिहिलेल्या बाटलीतील द्रव ओतते आणि पेला हलवून समरकेतूच्या हातात देते.)

समरकेतू: नाही, नाही. ललिते…

ललिता: का माघार घेताहात आता? माझ्या प्रेमासाठी वाटेल ते करायला तयार झाला होतात ना?

समरकेतू: तसं नव्हे, पण…

ललिता: पण काय?

समरकेतू: हे पेय तू तुझ्या हातानं मला पाजलं पाहिजेस असं मी म्हटलं होतं. तसं तू दिलंस तर अवश्य पिईन मी.

ललिता: (लाजून घुटमळते. प्रमोदिनीकडे पाहते. प्रमोदिनी मान डोलावते. अखेर मान खाली घालून ललिता आपल्या हातानं समरकेतूला पेय पाजते.)

समरकेतू: (छाती आणि पोटावरून हात फिरवीत) अहाहा… अमृतच जणू ललितेनं मला दिलं आहे की… अगदी पक्ष्याप्रमाणे हवेत तरंगल्यासारखं वाटतंय्. (कोसळतो)

ललिता: उठा, युवराज—उगीच अभिनय करू नका. त्या पेयात विष वगैरे मुळीच घातलं नव्हतं. या बाटलीतलं शुद्ध पाणी मी त्या पेयात टाकलं होतं. फक्त परीक्षा घेण्यासाठी मी हे नाटक केलं होतं. म्हटलं, बघू या तुम्ही तयार होताय का हे ‘विष’ प्यायला? (समरकेतू उठत नाही. ललिता कावरीबावरी होऊन प्रमोदिनीकडे पाहते.)

प्रमोदिनी: काय झालं? युवराज उठत का नाहीत. राजकुमारी, युवराजांना हलवून पाहा.

ललिता: (हलवून समरकेतूला जागं करण्याचा प्रयत्न करते. समरकेतू जागा होत नाही. घाबरून किंकाळी फोडते.) युवराज जागे होत नाहीत. अरे बाप रे. मी हे काय करून बसले? प्रमोदिनी, तू काय टाकलं होतंस त्या पेयात? मी तुला द्राक्षरसाचं पेय बनवायला सांगितलं होतं.

प्रमोदिनी: अहो राजकुमारी, मी तेच बनवलं होतं. ते ठीक होतं. चांगलं झालंय् की नाही हे पाहायला मी ते थोडं पिऊनही पाहिलं होतं.

ललिता: (घाबरून जाऊन) अगबाई, युवराजांच्या कंठाशी हे काळं-निळं काय दिसू लागलंय्? प्रमोदिनी, जा लवकर राजवैद्यांना बोलावून घेऊन ये! (मूर्छित होऊन तीही कोसळते. प्रमोदिनी धावत महालाबाहेर जाते.)

## प्रवेश अकरावा

(राजवाड्याबाहेरील एक वाट. आरव आणि प्रमोदिनी समोरासमोर येतात.)

प्रमोदिनी: का रे, आरव, मला का तातडीनं भेटायला सांगितलंस?

आरव: (चिंतातुर चेहऱ्याने) मला एक सांग—युवराज समरकेतूंची तब्येत कशी आहे?

प्रमोदिनी: आता धोका टळलाय. राजवैद्यांनी लगेच वमन करायला लावल्यामुळे विष बाहेर पडलं आणि त्यांना आराम पडला. अजून

a

एका दिवसभरात नेहमीसारखे हिंडू-फिरू लागतील. युवराज्ञीही हा प्रकार पाहून बेशुद्ध झाल्या होत्या. त्याही आता ठीक आहेत.

आरव: (चेहऱ्यावर समाधान) हुश्श. काळजी मिटली...

प्रमोदिनी: हे ऐकायला मला तातडीनं बोलावलंस? मला रग्गड कामं पडल्येयत.

आरव: नाही ग. मनावरचा भार हलका झाला.

प्रमोदिनी: तुझ्या मनावर कसला भार?

आरव: अं—अं...

प्रमोदिनी: अरे अं अं काय करतोयस? नीट बोल की.

आरव: (काहीसा चाचरत) तू—तू वचन देत असलीस तर सांगतो.

प्रमोदिनी: अरे आरवा, कोंबडा जसा सारखा आरवत बसतो तशी सारखी वचनं कसली मागतोस माझ्याकडून?

आरव: तरीही.

प्रमोदिनी: ठीक आहे. काय वचन पाहिजे तुला?

आरव: तू मला वचन दे की मी जे सांगणार आहे ते ऐकल्यावर तू मला दोष देणार नाहीस. माझ्यावर पूर्वीसारखंच प्रेम करीत राहशील—अगदी आपलं लग्न होईपर्यंत.

प्रमोदिनी: (लाजून खाली बघत) हं, हं. दिलं वचन.

आरव: बघ हं.

प्रमोदिनी: हो, हो. आता सांग.

आरव: पण कुठेही वाच्यता करू नकोस हं. आततायी होऊन काही करूही नकोस.

प्रमोदिनी: हो रे बाबा.

आरव: अग तू युवराज समरकेतूंसाठी बनवलेल्या पेयामध्ये मला युवराज रणधीरांनी एक चूर्ण टाकायला सांगितलं होतं. मात्र मला माहीत नव्हतं की ते कसलं चूर्ण आहे ते. मला म्हणालेवते की त्यानं तरतरी येईल.

प्रमोदिनी: अग बाई. पण कसलं होतं ते चूर्ण? युवराज बेशुद्ध पडले की! कशाला केलास हा गाढवपणा? नशीब, वेळीच उपचार झाल्यानं काही वाईटसाईट घडलं नाही! आणि तुला कसं माहीत की मी युवराज समरकेतूंसाठी पेय बनवणार आहे म्हणून?

आरव: अग तूच परीक्षेबद्दल सांगितलं नव्हतंस का? ते मी युवराज रणधीर यांना सांगितलं. मग त्यांनीच कायम तुझ्यावर लक्ष ठेवायला सांगितलं आणि पेयात चूर्ण टाकायला सांगितलं. मला हे जमणारच नव्हतं पण नेमकं तुला राजकुमारींनी बोलावलं आणि मला ते टाकता आलं.

प्रमोदिनी: मूर्खा, केवढा अनर्थ करून ठेवलास? आणि युवराज्ञींना माझ्यावर संशय येतोय्.

आरव: हे बघ, मला चूर्णाबद्दल काही माहीत नव्हतं आणि शेवटी मी युवराज रणधीर यांच्या आज्ञेचं पालन करत होतो.

प्रमोदिनी: (विचार करून) हां, तेही खरंच. पण युवराजांनी तरी असं का करावं? केवळ युवराज्ञींचं हृदय जिंकण्यासाठी? छे, छे. आता या सगळ्याचा उलगडा केलाच पाहिजे.

आरव: हे बघ. योग्य वेळ येताच आपण उलगडा करू. युवराज रणधीर यात गुंतले आहेत हे लक्षात घे. आणि—

प्रमोदिनी: आणि काय?

आरव: तू मला वचन दिलंयस् की तू आततायीपणा करणार नाहीस म्हणून. याशिवाय…

प्रमोदिनी: याशिवाय काय?

आरव: तू असंही वचन दिलंयस् की तू माझ्यावर पूर्वीइतकंच प्रेम करत राहशील म्हणून.

प्रमोदिनी: (लाजून) चल जा!

(विदूषक अवतरतो.)

विदूषक: इथे प्रेमिक एकमेकांना वचनं देताहेत. आमचा हिशोब मात्र कोरडाठक्क! इकडे लाजून प्रेमाची पावती देतायत. आणि आमचं? (बेसुऱ्या आवाजात गातो) *कसली आली पावती? नाही कुणी सभोवती, मी आहे कोरडा, आता नुसतं रडा रडा!*

a

## प्रवेश बारावा

(रणधीर एकटाच महालात येरझारा घालीत आहे.)

रणधीर: (स्वत:शीच) अरेरे. मी इतक्या नीच पातळीला जावं? आपली पोळी भाजून घेण्याकरता सौधावरून उडी मारण्याचं आव्हान स्वीकारून खाली सेवकांच्या हाती अलगद पडावं? प्रमोदिनी आणि आरव यांचा वापर करून समरकेतूसाठी बनवलेल्या पेयात धोत्र्याच्या बियांचं चूर्ण कालवलं. अरेरे, हे मी काय करून बसलो… (मंचकावर बसतो.)

### पद २२

*मी हे काय करुन बसलो*
*अनुचित असल्या जाळ्यामध्ये असा कसा फसलो*
*आरवला हाताशी धरले*
*ललितेला मी कसे ठकविले*
*खलमार्गाला असा कसा गेलो*
*मी हे काय…*

*भोळ्या अपुल्या समरकेतुला*
*कपटे दिधला मी विषप्याला*
*जिवंत असुनी खराखुरा मेलो*
*मी हे काय…*

(काही काळ स्तब्धता. रणधीर उठून पुन्हा येरझारा घालू लागतो.)

छे. मी जिवंत असून खरोखरी मेल्यातच जमा आहे. हे असलं खलमार्गी जीवन जगणं हे मृत्यूहूनही खालच्या पातळीचं आहे. (काही काळ विचारात गढतो. अचानक काहीतरी गवसल्याप्रमाणे जरा मोठ्यानं म्हणतो.)

असे नुसते विचार काय उपयोगाचे? कृती हवी. मृत्यूला कवटाळणं हेच योग्य ठरेल.

(इकडे-तिकडे पाहतो.) कुठं ठेवल्या मी त्या धोत्र्याच्या बिया? त्याच खाऊन ह्या जगातून मुक्ती मिळवावी हेच खरं (शोधतो. अखेर एका गादीखाली पुरचुंडी मिळते.)

अहाहा—आता माझा मार्ग मोकळा झाला—भूलोक सोडून अनंताकडे जाण्याचा. (पुरचुंडी उघडून धोत्र्याच्या बिया हातात घेऊन तोंडाकडे नेतो. पण अचानक थांबतो.) छे, हे मी काय करतोय्? मी जर इथं मृतावस्थेत सापडलो तर लोक काय म्हणतील? राजकुमार रणधीर फक्त उपभोगी जीवन जगले—उपयोगी नाही. त्यांनी आयुष्यात फक्त मौज-मजा केली—कुठलंही चांगलं काम केलं नाही. मग? (पुन्हा काही काळ विचारमग्न. पुन्हा एकदा त्याला काहीतरी सुचतं.) हां जाण्यापूर्वी काहीतरी चांगलं काम करून जावं. काय चांगलं काम करावं बरं? (धोत्र्याच्या बियांची पुरचुंडी अंगरख्याच्या खिशात ठेवतो.) हां, महाराजांनी जैन मुनींची भेट घेऊन त्यांच्या वतीनं मुनींचा सत्कार आणि स्वागत करायला सांगितलं आहे. मला ते अयोग्य वाटलं होतं. पण महाराजांचा विचार योग्यच आहे. असे थोर मुनी आदरालाच पात्र आहेत. ठीक आहे तर मग असाच या

पावली मुनींकडे जातो आणि त्यांच्या सत्काराचं पुण्य तरी पदरात पाडून घेतो. मग मृत्यूला सामोरं जाताना समाधान तरी वाटेल. (तडकाफडकी निघतो.)

## प्रवेश तेरावा

(जैन मंदिर. मुनिवर एका चौरंगासारख्या आसनावर बसलेले आहेत. शेजारी एक शिष्य-सेवक बसलेला आहे.)

ललकारी: युवराज रणधीर भवसागर मुनींची भेट घ्यायला येत आहेत.

(रणधीर प्रवेश करतो. शेजारील आसनावर बसावयास लागतो.)

भवसागर: युवराज रणधीर, जोपर्यंत तुम्हाला आसनस्थ व्हायला सांगितलेलं नाही तोपर्यंत तुम्ही बसायचं नाही.

रणधीर: (संतप्त. एक हात तलवारीच्या मुठीकडे जातो. मुनींचं लक्ष त्याकडे जातं.)

भवसागर: युवराज, लक्षात ठेवा. हे मंदिर आहे—राजवाडा नाही. इथं तुम्ही सामान्य नागरिकच आहात.

रणधीर: (भानावर येऊन) पण मी थोरल्या राजांच्या वतीनं आपला सत्कार करायला आलोय्.

भवसागर: असू द्या. (शिष्य खुणेनं मुनींना नमस्कार करण्याबद्दल रणधीरला सुचवितो. नाखुषीनंच रणधीर नमस्कार करण्यासाठी गुडघे टेकून

a

वाकतो. त्यासरशी कमरेला बांधलेली पुरचुंडी बाजूला पडते. सेवक-शिष्य ती उचलून रणधीरला देत असताना सांडते आणि धोत्र्याच्या बिया इतस्तत: विखुरतात. मुनिवर शिष्याला खूण करतात. शिष्य बिया हातात घेऊन मुनिवरांसमोर धरतो.)

भवसागर: (खंबीर घनगंभीर आवाजात) या तर धोत्र्याच्या बिया दिसतायत. युवराज या का घेऊन फिरताय?

रणधीर: (गडबडून जातो. लटपटत्या आवाजात) काही नाही. हे आपलं ते…

भवसागर: धोत्र्याच्या बिया घेऊन मंदिरात माझा सत्कार करायला आलात, युवराज? काय बेत आहे तुमचा?

रणधीर: नाही, नाही. अं…

भवसागर: माझ्या ज्ञानाप्रमाणे धोत्र्याच्या बियांचे दोनच उपयोग असतात: एक-नशेसाठी आणि दोन-विष म्हणून. युवराज, तुम्ही मला विष द्यायला आला होतात काय?

रणधीर: (लटपटून जात) नाही.

भवसागर: मग नशेसाठी किंवा आत्महत्या करण्यासाठी?

रणधीर: (थोडाफार भानावर येऊन) अं, होय.

भवसागर: पण दोन्हीपैकी काय? नशा की आत्महत्या?

रणधीर: न-नशेसाठी…

भवसागर: युवराज, तुमची बुद्धी भ्रष्ट झालीय् काय?

a

रणधीर: क-का? नशेसाठी कधी...

भवसागर: असला आततायीपणा कुणी करणार नाही कारण अशी नशा करताना मृत्यू ओढवतो हे माहीत नाही काय तुम्हाला? काय ते खरं सांगा अन्यथा आम्ही राजेसाहेबांच्या सत्काराचा स्वीकार करू शकणार नाही. युवराज तुम्हाला असंच परत जावं लागेल.

रणधीर: (काकुळतीला येऊन) नका, नका, मुनिवर असं करू नका. अनर्थ ओढवेल. राजेसाहेबांना आणि आम्हाला कुणालाही तोंड दाखवायला जागा राहणार नाही.

भवसागर: आम्ही तत्त्वानं बांधले गेलेलो आहोत. एक तर तुम्ही सत्य काय ते सांगा—कारण तुम्ही इथं असला पदार्थ घेऊन आला आहात—युवराज. आम्हाला अंतिम सत्य कळेलच. अन्यथा तुम्हाला येथून असंच परत जावं लागेल—महाराजांना आम्ही त्यांचा सत्कार स्वीकार करू शकत नसल्याचा निरोप घेऊन! अर्थात् तुमचा हेतू प्रामाणिक असल्यास आम्ही तुम्हाला क्षमा करू शकतो.

रणधीर: क्षमा असावी महाराज. मी आपल्याला सत्य काय ते विदित करतो. पण—(शिष्य-सेवकाकडे कटाक्ष टाकतो. मुनिवर त्याला खुणेनंच जायला सांगतात.)

(पुढील काही काळ स्पॉटलाइट मुनींवर आणि रणधीरवर. मुख्यत्वेकरून रणधीर बोलत आहे आणि मुनी मधूनमधून बोलत आहेत. परंतु ते काय बोलत आहेत ते प्रेक्षकांना ऐकू येत नाही.)

भवसागर: हं. असं आहे तर सगळं. आत्महत्या किंवा आत्महत्येचा विचार करणे हा एक अपराध आहे. मानवी आयुष्य अतिशय बहुमोल आहे, बालका. ते असं वाया घालवू नकोस. त्याचा इतरांसाठी उपयोग होईल असं काही तरी तुला करावं लागेल. तुला पश्चात्ताप झाला असेल तर मार्ग काढता येईल.

रणधीर: मला मान्य आहे. आपण मला उपयुक्त जीवनाचा मार्ग सांगण्याची कृपा करावी.

भवसागर: ठीक आहे तर ऐक...

(दोघे एकमेकांशी बोलत असतानाच दिवे मंद होत जातात आणि पुढचा प्रवेश सुरू होतो.)

## प्रवेश चौदावा

(रणधीर एकटाच आपल्या महालात चिंतन करीत बसला आहे.)

रणधीर: आता माझ्या मनावरचं मळभ दूर झालं. मुनिवरांनी मला जगण्याची दिशा दाखवली. मन स्वार्थ, अहंकार आणि लोभ यांपासून कसं दूर ठेवायचं ते सांगितलं. अंत:करण निर्मळ कसं ठेवायचं त्याची दीक्षा दिली. शरीराबरोबरच मनाची स्वच्छता आपण करीत नाही—तीही तितकीच आवश्यक आहे. (क्षणभर डोळे मिटून ध्यानस्थ होतो. नंतर डोळे उघडून बसतो.) आता मी माझ्या चांगल्या वागण्यानं लोकांना आश्चर्याचा धक्का देणार आहे. बस्स. आता मी बदललो—पूर्ण बदललो.

(अवधी) मी किती अहंकारी आणि स्वार्थी होतो. मुनींनी मला माझी जागा दाखवून दिली. बिचाऱ्या मुनिवरांनाही माझ्या अहंकाराची आणि गर्वाची झळ पोचली. मी त्यांची क्षमा मागितल्येय् खरी पण त्यांनी मला क्षमा करायला हवी.

(अवधी) मला आता हे ऐश्वर्य, हे भोग नकोसे झालेत. कधी एकदा हे सगळं सोडून वनात जातोय् असं झालंय् मला. मुनींच्या उपदेशानं कसं जगावं—लोकांच्या उपयोगी कसं पडावं आणि त्याचसाठी हे आयुष्य कसं वेचावं हे आता मला कळलंय्.

(अवधी) मी मुनींशी किती वाईट बोललो; त्यांचा उपमर्द केला. छे, आता मला माझ्या वागणुकीनंच त्यांचं मन जिंकायला हवं.

## पद २३

(पृथ्वी वृत्त)

*अता समजले गुरूकडुनि ते जगावे कसे*
*जनांसि उपयोग, त्याग, करुणा, मनी ज्या वसे ।*
*कुणा न दुखवून जो निशिदिनी सुखा त्यागतो*
*अशाच मनुजास मोक्ष सहजी पहा लाभतो ॥*
*म्हणून खुशिने असे ठरवितो पुढे जायचे*
*स्मरून गुरुमंत्र नित्य व्रत हे न मोडायचे ।*
*नकोच मज राजछत्र, कसली न इच्छा मनी*
*त्यजून सुख; शांति प्राप्त करण्यास जातो वनी ॥*

**<u>प्रवेश पंधरावा</u>**

(समरकेतू आणि लवाजमा मिरवणुकीच्या शेवटाला आलेले आहेत.)

सैनिक: मी स्वत: होतो युवराजांबरोबर युद्धात. त्यांच्या शौर्याकडे बघून आम्हीही वीरश्रीनं पेटून उठलो आणि शत्रूवर तुटून पडलो. खरोखर समरकेतू युवराजांचा पराक्रम डोळयांनी बघावयास मिळणं म्हणजे अहोभाग्य.

**<u>पद २४</u>**

(वृत्त: शार्दूलविक्रीडित)

*झालो धन्य बघून शौर्य समरी शत्रू खडे चारले*
*'केतू' राजकुमार खूप लढला हे दृश्य मी पाहिले ।*
*ना झाला कधिही पराक्रम असा या सर्व भूमंडळी*
*येई राजकुमार गौरव करू अर्पून पुष्पांजली ॥*

(आरव आणि प्रमोदिनी समरकेतूवर पुष्पवृष्टी करतात)

ललिता: समरकेतू, कसं वाटतंय् नगरात विजयी होऊन परत आल्यावर?

समरकेतू: खूपच समाधान वाटतंय्. तुम्हा सर्वांना इतक्या दिवसांनी भेटल्यावर तर अतिशय आनंद होतोय्. पण खरं सांगू का?

ललिता: हो सांगा ना.

समरकेतू: थोरल्या महाराजांनी टाकलेला विश्वास सार्थ करून दाखवला त्याचं सर्वात जास्त समाधान आहे.

## पद २५

*जिंकून युद्ध आलो शत्रू पुरा निमाला*
*परचक्र दूर झाले तो देश मुक्त झाला।।धृ।।*
*शत्रूस चारिली मी समरांगणात धूळ*
*त्याचा लढून केला नि:पात मी समूळ*
*आता चुकून कोणी करणार नाहि हल्ला*
*जिंकून युद्ध आलो...*
*कर्तव्य पूर्ण केले धर्मास जागलो मी*
*बधणार मात्र नाही कुठल्या भयास आम्ही*
*ध्वज आज आपुला मी खूप उंच नेला*
*जिंकून युद्ध आलो...*

## प्रवेश सोळावा

(समरकेतू, रणधीर, ललिता, प्रमोदिनी आणि आरव राजमहालात. प्रमोदिनी आणि आरव उभे—बाकीचे मंचकावर बसलेले.)

समरकेतू: ललिते, कशी आहेस तू? माझी आठवण येत होती का? मला तर सारखी तुझी आठवण येत होती.

ललिता: (चेष्टेनं) मग लढाईत व्यत्यय आला असेल?

समरकेतू: छे, छे. रणांगणावर एकच ध्येय. शत्रूला नेस्तनाबूद करणे. पण युद्ध संपल्यावर मात्र कधी एकदा स्वगृही जाऊन तुला भेटेन असं झालं होतं. पण माझ्या प्रश्नाचं उत्तर तू दिलंच नाहीयेस.

ललिता: इश्श.

समरकेतू: हं... आता मिळालं असं म्हणायचं.

(रणधीर इकडे तिकडे पाहतो. लक्ष नसल्याचं दाखवतो.)

रणधीर: समर, तुझ्या विजयामुळे थोरले महाराज खूप आनंदित झाले आहेत.

समरकेतू: ही सगळी त्यांचीच कृपा आहे. खरा विजय त्यांचाच आहे. मी केवळ त्यांचा प्रतिनिधी होतो.

प्रमोदिनी: पण अगदी थोडे सैनिक घेऊन मोहीम यशस्वी करायची ही खरोखरीच अभिमानाची गोष्ट आहे. जनतेमध्ये तर केवढा आनंद ओसंडून वाहत होता.

रणधीर: होय. अगदी प्रत्येक नागरिकाला समरकेतूला भेटायची इच्छा होती.

प्रमोदिनी: लोक सौधावरून हार फेकत होते.

आरव: स्त्रिया जागोजागी मिरवणूक थांबवून ओवाळीत होत्या. काही युवती तर गुलाबपाकळ्यांची वृष्टी करीत होत्या.

रणधीर: नगरामध्ये अगदी उत्साहाचं आणि उत्सवाचं वातावरण होतं.

समरकेतू: पण रणधीर, खरं सांगू? मी थोरल्या महाराजांना एक विनंती केली होती.

रणधीर: कसली विनंती?

समरकेतू: मी महाराजांना म्हटलं होतं—माझ्याबरोबर रणधीरला येऊ द्या.

रणधीर: (जवळजवळ ओरडतोच) काऽऽय?

समरकेतू: होय. हे सत्य आहे.

रणधीर: पण आम्ही ऐकलं होतं की महाराजांनी सेना घेऊन जायला सांगितलं होतं असं आणि तुम्ही त्याला नकार दिला म्हणून…

प्रमोदिनी आणि ललिता: (एकसुरात) हो आम्हीही असंच ऐकलं होतं.

समरकेतू: होय. तेही सत्य आहे.

रणधीर: (बुचकळ्यात पडून) पण… मग…

समरकेतू: सांगतो. जेव्हा थोरल्या महाराजांनी मला सेना घेऊन बंड मोडून काढायला सांगितलं तेव्हाच मी त्यांना म्हटलं की मला सेना नको. माझ्याबरोबर फक्त रणधीरला येऊ द्या.

रणधीर: (उत्कंठेनं) मग महाराज काय म्हणाले?

समरकेतू: महाराजांनी ठाम नकार दिला. ते म्हणाले—रणधीरला इथंच राहू दे. त्याला राज्यकारभार बघू दे. मी जशी तुझी परीक्षा घेतोय् तशी मला त्याचीही परीक्षा घेऊ दे. त्यालाही राज्यकारभाराचा अनुभव यायला हवा.

रणधीर: अरे बाप रे.

समरकेतू: काय, रणधीर, काय झालं?

रणधीर: छे, छे, काही नाही.

समरकेतू: माझं महाराजांशी या विषयावर जवळजवळ भांडणच झालं. मी तुला घेऊन जाण्यासाठी हट्टालाच पेटलो. पण महाराज काही बधेनातच.

ललिता: (उत्कंठेनं) मग काय झालं?

समरकेतू: मग काय होणार? थोरल्या महाराजांनी त्यांचं अस्त्र वापरलं.

ललिता: अस्त्र?

समरकेतू: महाराज म्हणाले—समरकेतू, तू सेनेसह जाऊन बंडाचा नि:पात करून ये—आणि ही माझी आज्ञा आहे.

ललिता: असं झालं होय?

समरकेतू: मग मीही चलाखी केली.

रणधीर: कसली चलाखी?

समरकेतू: मी महाराजांना सांगितलं की मी आपल्या आज्ञेवरून बंडाचा बीमोड करायला निघतो. पण तांत्रिक दृष्ट्या मी या मोहिमेचा सेनापती आहे.

ललिता: बरं मग?

समरकेतू: तेव्हा सेनापती या नात्यानं माझ्याबरोबर किती सैनिक असावेत हे ठरविण्याचा अधिकार मला आहे.

ललिता: ओ हो. आता आलं लक्षात...

समरकेतू: पण शेवटी महाराजांच्या विचाराला मान देऊन दहा-बारा सैनिकांना घेऊन गेलो.

रणधीर: (स्वगत) अरेरे. किती मूर्ख मी? हे काय करून बसलो? महाराज माझी परीक्षा घेत होते आणि मी विलासात बुडून गेलो होतो. आणि— आणि समरकेतूचा उगीच द्वेष करीत होतो. त्यानं तर मला घेऊन युद्धावर जाण्याची इच्छा महाराजांकडे व्यक्त केली होती. याशिवाय मी त्याच्यावर विषप्रयोगही करवला. ललितेशी खोटं वागलो. सौधावरून उडी घेताना फसवलं. खरोखरी ललितेस लायक पती समरकेतू हाच आहे. मीच माघार घ्यायला हवी.

(उघड) मी जातो आता—नंतर निवांत भेटू (जातो.)

ललिता: (एकीकडे) खरंतर आता माझं मन स्थिरावलंय्. मला समरकेतूबरोबर जीवन व्यतीत करण्याची इच्छा झालीय्. पण—पण रणधीरला काय वाटेल? तोही माझ्यावर प्रेम करतोय् आणि त्याला असं वाटत असेल की मीही त्याच्यावर प्रेम करत्येय्. आता हा तिढा कसा सुटावा? (उघड) युवराज समरकेतू, तुम्ही खूप दमला असाल. आल्याआल्या दिवसभर मिरवणुका अन् सत्कार चाललेत. आता तुम्ही विश्रांती घ्यावी. प्रमोदिनी, चल माझ्याबरोबर. (समरकेतूखेरीज सगळे जातात.)

समरकेतू: हुश्श. खरोखरीच थकवा आलेला आहे. विश्रांतीची गरज आहे. उद्या महाराजांना पुन्हा भेटून आदेश घ्यायला हवा. पण आज रणधीर काहीसा अस्वस्थ दिसला. ललिताही बेचैन होती. ललितेवर माझं प्रेम आहे. पण रणधीरही तिच्यावर प्रेम करतोय्. ललितेला सावकाशपणे विचारायला हवं. त्यांचं अगोदरच ठरलं तर नसेल ना—महाराजांची

a

अनुज्ञा घेऊन? पण मला नक्की कळवलं गेलं असतं. कदाचित् युद्धात गुंतल्यानं कळवता आलं नसेल. पण उशीर होण्याआधी याचा निर्णय व्हायलाच हवा.

## प्रवेश सतरावा

(ललिता आणि प्रमोदिनी महालात बसले आहेत.)

प्रमोदिनी: आता आज तर काय धामधूमच! युवराज्ञींचा वाढदिवस आहे. दोन्ही युवराजांकडून शुभेच्छा आणि भेटवस्तू येणार. दोघेही भेटायला येणार.

ललिता: कसली धामधूम. मला तर चिंताच लागून राहिल्येय्.

प्रमोदिनी: आता कसली चिंता करताय् युवराज्ञी? आज तरी आनंदात राहा. मी माझ्याकडून तुम्हाला शुभेच्छा देते. युवराज्ञी, तुम्ही शतायुषी व्हा आणि तुम्हाला सुखाचं आणि आरोग्यमय जीवन लाभो.

ललिता: प्रमोदिनी, मी महाराजांना आईकडून आलेली पेटीही दिलेली आहे. त्यातसुद्धा काय संदेश दडलाय् ते माहीत नाही. शिवाय...

प्रमोदिनी: युवराज रणधीर आणि युवराज समरकेतू...

ललिता: होय ना. आता मी समरकेतूंशी विवाह करावा असा माझ्या मनाचा निश्चय झालाय् पण...

प्रमोदिनी: पण काय?

a

ललिता: रणधीरही माझ्यावर प्रेम करतायत आणि मी दोघांशीही प्रेमानं वागल्येय्. आता मी माझं हृदय समरकेतूंच्या पारड्यात टाकल्यावर रणधीरची काय अवस्था होईल? ते काही बरं-वाईट तर…

प्रमोदिनी: नका असं काही अभद्र मनातही आणू.

ललिता: पण ते आततायी आहेत असं वाटतं. त्यांना नकार दिला की कसं वाटेल याच विचारानं मनात चिंतेचं मोहोळ उठलंय्.

**पद २६**

*काय करावे ते मज नकळे*
*हे कसले मी करून बसले*
*एक निघाला भोग-विलासी*
*दुजा दाखवी शौर्य जगासी*
*तिकडे मग माझे मन झुकले*
*काय करावे...*

*एकाचा स्वीकार करावा*
*दुसऱ्याला अन् नकार द्यावा*
*अशी कशी मी यात अडकले*
*काय करावे...*

प्रमोदिनी: विश्वास ठेवा, युवराज्ञी. सर्व काही ठीक होईल.

(समरकेतू प्रवेशतो.)

समरकेतू: वाढदिवसाच्या लाख-लाख शुभेच्छा.

a

ललिता: धन्यवाद. विश्रांती झाली का? मला खात्री आहे की महाराज तुमच्या पराक्रमानं संतुष्ट झाले असतील आणि त्यांनी तुमच्यावर एक नवीन कामगिरी सोपवली असेल.

समरकेतू: थोरले महाराज माझ्या मोहिमेबद्दल समाधानी आहेत. अजून नवीन कामगिरी सोपवली नाहीय्.

ललिता: बसा ना. (जवळच मंचकावर बसण्यासाठी खूण करते. समरकेतू बसतो.)

समरकेतू: ललिते, मी तुझ्यासाठी एक उपहार आणला आहे. तू त्याचा स्वीकार करावास अशी माझी इच्छा आहे.

ललिता: (अधीर होऊन) काय आहे हा उपहार, युवराज?

(समरकेतू एक छोटीशी डबी पुढे करतो.)

समरकेतू: हा आहे माझा उपहार.

ललिता: काय आहे या डबीत?

समरकेतू: स्वत:च उघडून पाहा ना.

(ललिता डबी उघडते. मखमली डबीतील हिऱ्याची अंगठी पाहून हरखते.)

ललिता: अय्या! कित्ती छान आहे. युवराज, तुमची भेट खूपच छान आहे. आवडली मला.

समरकेतू: ललिते, मी ही अंगठी तुझ्या बोटात घालू इच्छितो.

a

(अचानक परिस्थितीची जाणीव होऊन ललिता कावरी-बावरी होते आणि काहीतरी आठवून दोन पावलं मागे सरकते.)

समरकेतू: ललिते, काय—काय झालं? आवडली ना अंगठी? आणि करशील ना माझ्याशी विवाह?

ललिता: अं—अं...

समरकेतू: काही समस्या आहे का? मी तुला आवडत नाही का? की तुझं दुसऱ्या कुणाशी काही ठरलंय्?

ललिता: नाही, तसं नाही. तुम्ही मला खूप आवडता. पण…

(पडद्याआडून ललकारी)

आरव: थोरल्या महाराजांचा युवराज्ञींना महत्त्वाचा संदेश… (आरव प्रवेशतो.)

ललिता: काय आहे संदेश?

(आरव एक पेटी ललितेला देतो.)

आरव: ही पेटी उघडा. थोरल्या महाराजांनी ही उघडून पाहिली आहे. त्यात त्यांचा संदेशही आहे.

ललिता: ही तर तीच पेटी जी आईनं—महाराणी रत्नमाला यांनी—मला दिली होती महाराजांकडे सुपूर्द करायला. मी वीस वर्षांची झाल्यावर उघडायची होती.

प्रमोदिनी: बरोबर. ही तुम्ही मला दाखवली होती. मीच नंतर ती महाराजांकडे पोचती केली होती.

a

ललिता: बरोबर. आता उघडून बघते काय आहे ते. (पेटी उघडते आणि दोन्ही बाजूला षटकोनी करंडक असलेली सुवर्णमाला बाहेर काढते.)

प्रमोदिनी: किती सुंदर आहे ही सोन्याची माळ.

ललिता: खरंच की. पण प्रत्येक करंडक म्हणजे एक लहानशी डबी आहे. (एक करंडक उघडते) आत एक संदेश दिसतोय्. म्हणजे दुसऱ्या बाजूच्या करंडकातही संदेश असणार! (दुसरा करंडकही उघडते) एक आईकडून आलेला दिसतोय् कारण त्यावर शत्रुजित महाराजांची मोहर आहे आणि हा दुसरा संदेश मात्र आपल्याच थोरल्या महाराजांचा आहे कारण त्यावर त्यांची मुद्रा आहे. प्रथम मी आईचा संदेश वाचते. (गुंडाळी केलेला रेशमी तुकडा उलगडते आणि वाचून पुन्हा पेटीत ठेवते. नंतर दुसरा संदेश वाचते. वाचताना तिची मुद्रा खुलत जाते. वाचून झाल्यावर तोही गुंडाळून पेटीत ठेवते आणि सुवर्णमाला गळ्यात घालते.)

समरकेतू: सर्व काही ठीक आहे ना? ललिते, तू खुशीत दिसत्येयस. आम्हाला सांगण्यासारखं असेल तर अवश्य सांग.

ललिता: होय, होय. आनंदाचीच वार्ता आहे.

समरकेतू आणि प्रमोदिनी (एकदम): मग काय आहे ती वार्ता?

ललिता: आईच्या संदेशात असं लिहिलंय् की करंडकातील आदेश वाचावा आणि मग निर्णय घ्यावा. दुसऱ्या संदेशात महाराजांनी लिहिलं आहे की—त्यात—त्यात असं सुचविलं आहे की—आहे की—(लाजते)

a

समरकेतू: ललिते, अग सांग ना? लाजतेयस काय अशी?

ललिता: (लाजून) इश्श!

प्रमोदिनी: असं काय करताय् युवराज्ञी? आमचा जीव टांगणीला लावताय्.

(ललिता प्रमोदिनीच्या कानात सांगते. प्रमोदिनी स्मित हास्य करते.)

समरकेतू: (अस्वस्थ होऊन) प्रमोदिनी, आता आम्हाला कळेल का?

प्रमोदिनी: अहो युवराज, या सगळ्या संदेशांमधून... आत्ता युवराज्ञींच्या मनात आहे तसंच करण्याचा आदेश देण्यात आला आहे.

समरकेतू: (काहीसं चिडून) च् च्. म्हणजे काय? याचा काय अर्थ घ्यायचा आम्ही?

प्रमोदिनी: युवराज, रागावू नका. युवराज्ञी ललिता यांचा विवाह आपल्याशी व्हावा असा संदेश आहे.

समरकेतू: होय का? पण असं कसं सुचवलं गेलं ललितेच्या मातोश्रींकडून?

प्रमोदिनी: त्याचं असं झालं की आपण लहान असताना वसुमती नगरीला गेला होतात.

समरकेतू: होय. मी सात-आठ वर्षांचा असेन. कृतवर्मा महाराजांना भृंगराज महाराजांचं म्हणजे ललितेच्या वडिलांचं आमंत्रण होतं. मीही त्यांच्या लवाजम्यात होतो. आम्ही काही दिवस वसुमतीच्या राजवाड्यात राहिलो होतो.

a

प्रमोदिनी: आणि युवराज्ञी त्यावेळी लहान बालिका होत्या. राजप्रासादाच्या उद्यानात खेळत असताना एक महाभयंकर सर्प युवराज्ञींच्या दिशेनं त्यांना दंश करण्याच्या हेतूनं झेपावला तेव्हा आपण त्या सर्पाला ठार मारून युवराज्ञींचे प्राण वाचवलेत. तेव्हाच भृंगराज महाराज आणि महाराणी रत्नमाला यांच्या मनात युवराज्ञींचा विवाह आपल्याशी व्हावा अशी इच्छा निर्माण झाली. पण पुढं राज्यावर परचक्र आलं आणि दिवस बदलले. भृंगराज महाराजांनी त्यांच्या अखेरच्या दिवसात ही इच्छा या सुवर्णमालेत लिहून ठेवण्याचा आदेश दिला आणि ही माला युवराज्ञींना विसावं वर्ष लागलं की कृतवर्मा महाराजांच्या हस्ते भेट देण्यास सांगितलं.

समरकेतू: (आनंदून) वा: वा: हे तर छानच झालं. ललिते, आण ती डबी.

(ललिता डबी देते. समरकेतू ती उघडून त्यातील अंगठी काढतो आणि ललितेचा हात हातात घेतो.)

ललिता: (एकाएकी हात मागे घेऊन) नाही, नाही. अनर्थ होईल. घात होईल...

समरकेतू: (चक्रावून आणि चिडून) आता काय झालं? तुमच्या मातोश्रींची अनुमती आहे. कृतवर्मा महाराजांचीही मान्यता आहे. मग घोडं कुठं अडलंय्?

ललिता: (किंचित् स्फुंदत) रागावू नका युवराज समरकेतू. पण…

समरकेतू: पण काय?

ललिता: र-रणधीरही माझ्या हात हाती घेण्याची आकांक्षा बाळगून आहेत. त्यांना क-काय वाटेल?

समरकेतू: हं. तर समस्या ही आहे तर (डोके खाजवतो. तेवढ्यात रणधीर प्रवेशतो.)

रणधीर: काहीच चिंता नको. युवराज समरकेतू आणि युवराज्ञी ललिता तुम्ही विवाह करण्यास मोकळे आहात. माझा मुळीच अडथळा होणार नाही.

समरकेतू: हे कसं काय? रणधीर तुम्ही चिडून जाऊन तर असा निर्णय...

ललिता: होय, युवराज रणधीर खरं काय ते स्पष्ट सांगा.

रणधीर: मी सत्यच सांगतोय्. अगदी राजी-खुषीनं मी माघार घेतोय्. होय, एके काळी मी ललितेवर प्रेम करीत होतो.

समरकेतू: मग?

रणधीर: मी आततायीपणानं वाटेल तसा वागलो. मी वासनांधही झालो. कृतवर्मा महाराज माझी परीक्षा घेत आहेत याची मला पुसटशी सुद्धा कल्पना आली नाही. मी जुगार, नाच-गाणी यात वेळ वाया घालवला. महाराजांच्या अपेक्षेप्रमाणे राज्यकारभारात अजिबात लक्ष घातलं नाही. उलट काही व्यक्तींवर अत्याचारही केले. (प्रमोदिनीकडे सार्थ कटाक्ष टाकतो.) महाराजांच्या विश्वासाला पात्र ठरलो नाही.

समरकेतू: अरेरे. मला याची काहीच कल्पना नव्हती. मला खात्री आहे की महाराज तुम्हाला क्षमा करतील आणि पुन्हा संधी देऊन कारभारात…

a

रणधीर: याशिवाय मी ललितेनं घेतलेल्या प्रेमाच्या परीक्षेत लबाडी केली.

ललिता: अगबाई. काय केलंत तुम्ही?

रणधीर: आरवला हाताशी धरून उडी मारण्याच्या वेळी मला खाली झेलण्याची व्यवस्था केली.

ललिता: पण तुम्ही तर काही काळ लंगडत होतात, उपचार घेत होतात...

रणधीर: ते सगळं नाटक होतं. मला तुमच्या प्रमोदिनीनंही थोडीफार मदत केली. अर्थात् यात आरव आणि प्रमोदिनी यांचा काहीच दोष नाही. ते बिचारे माझ्या आज्ञेप्रमाणे वागत होते. शिवाय मी त्यांना धमकावलंही होतं.

ललिता: (आळीपाळीनं प्रमोदिनी, आरव आणि समरकेतू यांच्याकडे पाहत राहते) अरे बापरे! हे सगळं तुम्ही कसं काय करू शकलात?

रणधीर: मी केवळ तुझं हृदय जिंकण्याच्या ईर्षेनं पछाडलो गेलो होतो. मी इतक्यावरच थांबलो नाही तर मी समरकेतूचा घातही करण्याचा प्रयत्न केला...

समरकेतू आणि ललिता: (एकदम ओरडतात) काऽऽऽय?

रणधीर: होय. ललिते, तू विष म्हणून दिलेल्या साध्या पेयात मीच धोत्र्याच्या बियांचं चूर्ण कालविण्याची व्यवस्था केली होती. राजवैद्यांनी योग्य उपचार वेळीच केल्यानं समरकेतूला काही झालं नाही. याहून मोठा नीचपणा कुठला असेल. या सगळ्याचं मी आता प्रायश्चित्त घेणार आहे.

ललिता: कुठलाही अघोरी विचार मनात आणू नका, रणधीर!

a

समरकेतू: पण माझी खात्री आहे की महाराज उदार मनानं क्षमा करतील आणि राज्यकारभाराकडे लक्ष द्यायला सांगतील.

रणधीर: नाही ते शक्य नाही.

समरकेतू: पण का?

रणधीर: मी माझ्या हातून घडलेल्या प्रमादाचं प्रायश्चित्त घ्यायचं ठरवलं आहे.

ललिता: ते तुम्ही म्हणालात पण कसलं प्रायश्चित्त?

रणधीर: होय. प्रायश्चित्तच. आता मी या सत्ता, धन, वासना अशा सर्व मोहमयी गोष्टींपासून कायमचं दूर जायचं ठरवलं आहे.

समरकेतू: म्हणजे?

ललिता: तुम्ही काहीतरी भलतं-सलतं...

रणधीर: नाही, तुम्ही काही चिंता करू नका. मी पूर्ण विवेकानंच निर्णय घेऊन पुढचं पाऊल उचलणार आहे.

समरकेतू: पण तुम्ही काय करणार आहात?

रणधीर: (संथपणे गंभीर स्वरात) मी जैन धर्माची दीक्षा घेऊन आधी तप आणि मग समाजसेवा करायचा निश्चय केला आहे.

समरकेतू, ललिता: (एकसुरात) काऽऽऽय? (प्रमोदिनी आ वासून पाहत राहते)

रणधीर: होय हे सत्य आहे. याशिवाय याबाबत मी कृतवर्मा महाराजांची अनुमतीही मिळवली आहे.

## पद २७

*मज तोषवी न लक्ष्मी*
*नच भोग आणि सत्ता*
*गुरु, संत-सज्जनांचा*
*गिरवीन रोज कित्ता*

*जगणे कठीण होते*
*नियती करी परीक्षा*
*त्यातून मुक्त होण्या*
*घेईन आज दीक्षा*
*मज तोषवी...*

समरकेतू: म्हणजे आम्ही तुमच्या सहवासाला मुकणार तर.

रणधीर: छे, छे. अगदी तसंच काही नाही. राज्यकारभार व्यवस्थित चाललाय् की नाही हे पाहायला अधून-मधून येत राहीन आणि…

समरकेतू: आणि काय?

रणधीर: तो नीट चालावा यासाठी योग्य तो उपदेशही करीन!

(सर्वजण हसतात.)

समरकेतू: (ललितेकडे वळून) आता तरी काही समस्या नाही ना?

ललिता: (लाजून) अं हं.

समरकेतू: मग आण ती डबी. (ललिता डबी समरकेतूकडे देते. समरकेतू त्यातील अंगठी काढून ललितेच्या हातात घालतो. सर्वजण टाळ्या वाजवतात.) आता महाराजांच्याकडे निरोप पाठवतो. त्यांनी भेटीची वेळ दिली की त्यांचे आशीर्वाद घ्यायला जाऊ आणि पुढील कार्यक्रमही नक्की करू.

ललिता: (लाजून) इश्य!

(आरव प्रमोदिनीकडे पाहून बेचैन होतो. ललितेचं लक्ष त्याकडे जातं.)

ललिता: आरव, प्रमोदिनी? काय चाललंय्?

आरव: अं—अं... क-काही नाही...

प्रमोदिनी: म्ह—म्हणजे क-काय की?

ललिता: (हसून) हं आलं लक्षात! या दोघे इकडे. (आरव आणि प्रमोदिनी ललितेसमोर येऊन उभे राहतात. ललिता दोघांचे हात हातात घेऊन एकमेकांच्या हातात देते. समरकेतू त्यांच्यावर जवळच्या तबकातील फुलं उधळतो.)

आरव आणि प्रमोदिनी: (वाकून समरकेतू आणि ललिता यांच्या पायांना स्पर्श करतात.) आणि आम्हाला क्षमा कराल ना?

ललिता: (हसून मान डोलावते) शुभं भवतु!

समरकेतू: (मान डोलावतो) अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!

(विदूषक प्रवेशतो)

विदूषक: अरे वा, वा. सगळ्यांची प्रेमं जुळतायत, यशस्वी होतायत—छानच आहे. पण देवा, या विदूषकाकडे का दुर्लक्ष करतोयस? विदूषकाचं काम का हलकं समजलं जातंय्? खरं तर आम्ही लोक लोकांना त्यांच्या चिंतेतून बाहेर काढतो, त्यांना हसवतो...

प्रमोदिनी: अरे विदूषका, असा खिन्न होऊ नकोस या मंगल प्रसंगी.

विदूषक: मग काय करू तर? तुमचं सर्वांचं ठीक आहे. युवराज समरकेतू-युवराज्ञी ललितागौरी, तू प्रमोदिनी आणि आरव हे विवाहबद्ध होताय्. युवराज रणधीर हे दीक्षा घेऊन आपल्या राज्याचं भलं कसं होईल ते पाहणारेत. पण मी-मी...

प्रमोदिनी: असं मी-मी करू नकोस. देवाचं तुझ्याकडे लक्ष नाही म्हणतोस ना तू?

विदूषक: हो, मग?

प्रमोदिनी: देवाचं लक्ष आहे की नाही ते माहीत नाही पण एका कुणाचं तरी नक्की आहे.

विदूषक: म्हणजे? कुणाचं?

प्रमोदिनी: अरे, आपल्या राजवाड्यातच काम करणारी माझी एक सखी आहे— हेमवती. ती—ती तुझ्यावर खूप प्रेम करते.

विदूषक: कोण? ती पाकशाळेतली हेमवती? ती किती सुंदर आहे—ती कशाला माझ्यावर प्रेम करील?

प्रमोदिनी: वेडा आहेस—आणि भोळा पण. अरे ती खूप प्रेम करते तुझ्यावर! तिनंच मला हे गुपित सांगितलं.

a

विदूषक: पण मग तिनं का नाही प्रकट केलं माझ्यासमोर तिचं प्रेम?

प्रमोदिनी: अरे, इथे थोरा-मोठ्यांनादेखील प्रश्न पडतो प्रेम व्यक्त करण्याबाबत... (ललिता आणि समरकेतू यांच्याकडे हेतुपुर:सर पाहते आणि जीभ चावते) त्यांचा प्रश्न थोडा वेगळा असू शकतो—विकल्प किंवा प्रीतिसंभव... हेमवती लाजाळू आहे, बुजरी आहे. म्हणून तिनं माझ्याकडे तुझ्याबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. पण—पण तू तिचं प्रेम स्वीकारतोस का?

विदूषक: (आनंदानं उड्या मारीत) हो—अगदी एका पायावर! (एका पायावर उभा राहतो.) मलाही तिच्याबद्दल खूप काही वाटायचं—पण मी पडलो विदूषक...

समरकेतू: (पुढे होऊन) अरे असं काही नसतं. आपापलं काम प्रामाणिकपणे केलं की बस्स. कुणी उच्च, कुणी हलका असं काही नसतं...

विदूषक: (वाकून नमस्कार करतो) चला एक काळजी मिटली.

प्रमोदिनी: आता ती कोणती?

विदूषक: हेमवती पाकशाळेतली आहे ना? मग आयुष्यात पोटाची चिंता नाही! (पोटावरून हात फिरवतो. सगळे हसतात. बेसुरात गाणं गातो आणि कोलांट्या उड्या मारत सुटतो.) *ती सुंदर युवती... माझी हेमवती... माझे चित्त फिरे... तिच्याच भोवती...*

## प्रवेश अठरावा

(ललिता तिच्या महालात गुणगुणत बसली आहे. प्रमोदिनी प्रवेशते, पाठीमागे काहीतरी लपवून आणते आणि मंचकावरील मोठ्या तक्यामागे लपवून ठेवते.)

प्रमोदिनी: आता तर सगळ्या चिंता दूर झाल्या ना? आता अगदी स्वप्नात रममाण झाल्या असाल, युवराज्ञी.

ललिता: होय ग बाई! सगळ्या चिंता दूर झाल्या. आईलाही निरोप धाडला पाहिजे.

### पद २८

*भ्रांत मनाला शांति लाभली*
*कोडे सुटले, प्रश्नहि सुटला*
*मनासारखे सगळे झाले*
*आनंदी-आनंद जाहला*

प्रमोदिनी: नाही, युवराज्ञी. एक काम अपुरं राहिलंय्.

ललिता: ते कोणतं?

प्रमोदिनी: अहो युवराज्ञी, जरा आठवून पाहा. काहीतरी काम अपूर्ण राहिलंय् का ते?

ललिता: (लटक्या रागानं) प्रमोदिनी, असं कोड्यात बोलू नकोस. स्पष्ट काय सांग ते.

a

प्रमोदिनी: (तक्यामागील चौकट ललितेपुढे धरते) आता आलं का लक्षात? हे काम अजून अपूर्णच आहे.

ललिता: (चित्राकडे टक लावून पाहत) हं. हे आत्ता पूर्ण करते. पण साहित्य आणलंयस का?

प्रमोदिनी: (तक्यामागून चित्रकलेचं साहित्य बाहेर काढते आणि ललितेपुढे धरते.)

ललिता: अगदी थोड्या वेळात पूर्ण करते बघ. (चित्र प्रेक्षकांना दिसत नाही. ललिता ते एका आसनावर ठेवून त्यापुढे बसते आणि भराभर कुंचल्याचे फटकारे मारते. प्रमोदिनी लांब उभी राहते.)

ललिता: हं—आता बघ कसं वाटतंय् हे चित्र?

प्रमोदिनी: ओ हो. अगदी सुंदर. (चौकट हातात धरते आणि इकडे-तिकडे नाचत फिरते. चित्र आता प्रेक्षकांना दिसतं. ते चित्र समरकेतूचं असतं.)

ललिता: काय वाटतंय् तुला हे चित्र पाहिल्यावर?

प्रमोदिनी: असं वाटतंय् की या चित्रातच केवळ रंग भरलाय् असं नाही...

ललिता: मग?

प्रमोदिनी: तुमच्या जीवनातच रंग भरलाय् आता.


ललिता:

## पद २९

*स्मरणचित्र ते स्वप्नामधले*
*आज कसे ते पूर्ण जाहले*
*हृदयामधि मी जागविलेल्या*
*प्रीतीचे प्रतिबिंब उमटले*

(पडदा)

—०0०—




**श्री श्रीनिवास शारंगपाणी लिखित व ई साहित्यवर यापूर्वी प्रकाशित पुस्तके. कव्हरवर क्लिक करताच उघडतील.**



**ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षाचे होत आहे.**

**श्री श्रीनिवास शारंगपाणी यांचे ई साहित्यवरील हे तिसरे पुस्तक.**

श्री श्रीनिवास शारंगपाणी हे मराठी व इंग्रजी या भाषांचे विद्वान आहेत. त्यांनी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत विपुल लेखन केले आहे. सुमारे ५८ वर्षे त्यांचे विविध प्रकारचे साहित्य वेगवेगळ्या नियतकालिकांतून सातत्याने प्रकाशित होते. आपल्या नेहमीच्या जीवनातील अत्यंत क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींतूनही त्यांना खोलवरचा अर्थ दिसतो. त्यांची डझनभराहून अधिक पुस्तके विविध प्रकाशकांतर्फ़े प्रसिद्ध झाली आहेत. शिक्षणानं आणि व्यवसायानं ते इंजिनियर आहेत. नाटक हा त्यांचा आवडता वाङ्मयप्रकार असल्यानं त्यांनी इंग्रजी-मराठी नाटकं लिहिली आहेत. महान् गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्यावरच्या ‘डेथ ऑफ अ मॅड मॅथेमॅटिशियन’ या इंग्रजी नाटकाचा हिंदी आणि मराठी अवतार लोकांना विशेष आवडला. एकूण सहा मराठी आणि दोन इंग्रजी नाटकं त्यांनी आजवर लिहिली आहेत. तसे पहाता त्यांच्या पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

श्री श्रीनिवास शारंगपाणी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात.

a

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (**५०**), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (**५०**), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३५), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश

चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखानीस (३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (२), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।